परमपिता परमात्मा
त्रिमुर्ती शिवभगवानुवाच ''मन्मनाभव।''

# अमृत कुंभ

वर्ष ११ • अंक ४ • ऑक्टोबर–नोव्हेंबर २०१७

## मुखपृष्ठाविषयी

नर्कचतुर्दशीच्या दिवशी नरकासुराचा वध करण्यात आला अशी कथा आहे. वास्तविक नरकासुर हा माया अर्थात मनोविकारांचाच पर्यायी शब्द आहे. काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार यांना गीतेत नरकाचे द्वार म्हटले आहे. तसेच मनोविकारांना 'आसुरी लक्षण' मानण्यात आले आहे.

कलियुगाचे अंती परमपिता शिव परमात्मा या नरकासुरावर (अर्थात मनोविकारांवर) विजय प्राप्त करण्यासाठी, ईश्वरीय ज्ञान व राजयोग शिकवितात. त्यामुळे वर्तमान संगमयुगात मनोविकारांवर विजय मिळवणे, हे प्रत्येक ब्रह्मावत्साचे कर्तव्य आहे. परंतु विकाररूपी माया ही प्रत्येकाच्या कमजोरी प्रमाणे वार करते आणि निरनिराळ्या रूपामध्ये वार करते उदा. देहअभिमानवश ईर्ष्या, नफरत, दुसऱ्यांच्या कमजोरीचे वर्णन करणे, त्यांना कमी लेखणे, सतत स्पर्धा करणे, आपले मोठेपण सिद्ध करणे आदी.

त्यामुळे या दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर आपण दृढ संकल्प करू या की, आपल्या आतील सैतानावर (विकारांवर) योग अग्निद्वारे विजय प्राप्त करुया.. हाच भाव मुखपृष्ठावरील चित्रात दर्शविण्यात आला आहे.

**अमृतकुंभच्या सर्व वाचकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!**

**– प्रकाशक अमृतकुंभ**

## अंतरंग



१. दीपावली (जड व चैतन्य) संपादकीय..........२
२. अंतिम पेपरमध्ये पास व्हायचे असेल तर..........३
३. आत्मिक सौंदर्य हेच खरे सौंदर्य..........५
४. अज्ञान, अंधश्रद्धा व धर्मग्लानी नष्ट करूया !..........७
५. जसे कर्म तसे फळ..........८
६. ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता..........९
७. प्रसन्नतेचा आधार – संपन्नता..........१२
८. क्रोधावर विजय कसा प्राप्त कराल..........१५
९. सचित्र – सेवावृत्त..........१७
१०. खुशीचे निर्माता आपण स्वतःच आहोत..........२१
११. मनुष्य सृष्टीला प्रदूषित करणाऱ्या मनोविकारांचा त्याग हा त्याग नव्हे..........२२
१२. 'अत्त दीप भव'..........२६
१३. कारागृहातील माझा अनुभव..........२९
१४. तू दीपस्तंभ बाबा..........३१
१५. गोड फळे देईल का रे (कविता)..........३४
कधी तू करशील आत्मोन्नती (कविता)..........३४
१६. सचित्र सेवावृत्त..........३५

**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३ फोन: ०२२-२५३२२२०८.
E-mail :info@amrutkumbh.com.

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता:** बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ द्वारा :
प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.
मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट,२२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम)- ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले- संपादक ब्र.कु. शिवाजी चौधरी • संगणक अक्षरजुळवणी : मीडिया आर अॅण्ड डी प्रा. लि. १३, अमृत मधुरा, प्लॉट ३. सेक्टर ३, आरएससी चारकोप, कांदिवली (प) मुंबई – ४०० ०६७.

**वार्षिक वर्गणी रु. ६५/- • आजीव सभासद वर्गणी रु. १,३००/-**


**E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या - www.amrutkumbh.com**

संपादकीय....



# दीपावली

## (जड व चैतन्य)



भारतात प्रत्येक महिन्यांत कुठला ना कुठला सण व उत्सव साजरा केला जातो, परंतु सर्वाधिक सण असलेला महिना जर कुठला असेल, तर तो आहे आश्विन महिना. दसरा व दिवाळी हे दोन्ही सण याच महिन्यात येतात. नवरात्र संपताच दसरा येतो व दसरा गेल्यानंतर सर्वांना दिवाळीच्या सणाचे वेध लागतात. शाळा, कॉलेजातील विद्यार्थी तर दिवाळीची सुट्टी कधी सुरू होते, याची वाट पहात असतात. बऱ्याचशा कर्मचाऱ्यांना दिवाळीचा बोनस मिळणार असल्याने, त्यांचे लक्ष बोनसकडे लागलेले असते. बऱ्याच ठिकाणी दिवाळी सेल्स सुरू होतात. त्यामुळे गृहिणी खुश असतात. सर्वत्र आनंदाचे व उत्साहाचे वातावरण असते. हे सर्व जरी खरे असले तरी या सणाचे आध्यात्मिक रहस्य काळाच्या ओघात विस्मृत झाले आहे. केवळ सणाच्या दिवशी गोडधोड पदार्थ करून खाणे, नवीन कपडे घालणे, नवीन वस्तू खरेदी करणे, दिवाळीच्या दिवशी फटाके फोडणे, दिव्यांची रोषणाई करणे, रांगोळ्या काढणे इत्यादी गोष्टी केल्या जातात. त्यामुळे अशा सणांपासून मिळणारा आनंदही तात्पुरत्या स्वरूपाचा असतो. आपल्या आचार विचारात काही सुधारणा होत नसल्याने स्थायी स्वरूपाचे कुठलेही परिवर्तन दिसून येत नाही. दरवर्षी आश्विन अमावस्येला श्री लक्ष्मीचे पूजन सर्वत्र केले जाते. तरी देखील श्री लक्ष्मी प्रसन्न होत नाही. परिणामतःभारत देशातील दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या जनतेची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याला नेमके कारण कोणते हे आपण पाहूया.


आपण जाणतो की दरवर्षी दसऱ्यानंतर दिवाळीचा सण साजरा केला जातो, परंतु लोक जसे दसऱ्याला केवळ रावणाचा पुतळा जाळून त्यातच आपल्या पुरुषार्थाची संपन्नता मानतात व स्वतःचीच फसवणूक करून घेतात. तसेच दिवाळीत मातीचे दीपक, मेणबत्या अथवा विजेचे दिवे पेटवून स्वतःला खुश करतात. जसे ते मायारूपी रावणाला अर्थात पाच विकारांना जाळण्याचा पुरुषार्थ करत नाहीत तसेच ते आत्मारूपी दीपक प्रज्वलित करण्याचा देखील पुरुषार्थ करत नाहीत, त्यामुळे दरवर्षी दिवाळी साजरी करूनही आत्मारूपी दीपक विझलेलाच असतो. वास्तविक आत्मारुपी दीपक प्रज्वलित करणे, हीच खरी चैतन्य दीपावली आहे. याउलट केवळ मातीचे दीपक अथवा विजेचे दिवे प्रज्वलित करणे ही जड (यादगार) दीपावली आहे. या अनुषंगाने पुढील गीताच्या ओळी फारच उद्‍बोधक आहेत–

मातीच्या पणत्यांनी करिशी, तू दीपोत्सव साजरा!
आज चेतवी आत्मा दीपक, कधीच न विझणारा!
जीवन उजळूनि घे सत्वरी, दिवाळी करी अशी साजरी!

आजचा मनुष्य एकीकडे असंख्य दीपमाळा प्रज्वलित करतो परंतु दुसरीकडे तो ज्ञान प्रकाशासाठी व्याकुळ असलेल्या आत्मारूपी चैतन्य दीपकाची उपेक्षा करतो. तो परमपिता परमात्म्याद्वारे प्राप्त दिव्य ज्ञानज्योतिच्या प्रकाशाने आत्मारुपी दीपक प्रज्वलित करीत नाही तो घरादाराच्या सफाईकडे लक्ष देतो; परंतु अंतरंगातील विकारांचा कचरा काढून आत्म्याला दिव्य गुणांनी सजवित नाही. तो दिवाळीच्या मुहूर्तावर हिशोबाची नवीन खतावणी सुरु करतो. परंतु आपल्या कर्माच्या हिशोबाकडे मात्र लक्ष देत नाही. परिणामी दरवर्षी असंख्य दीप पेटवून मनातील अज्ञान अंधकार मात्र दूर होत नाही. दिवसेंदिवस तो वाढतच चालला आहे.

आपणा सर्वांना हे जाणून अत्यानंद होईल, की मानवमात्रातील अज्ञान अंधकार दूर करण्यासाठी कलियुगाचे अंती दिव्य ज्योतिपुंज परमपिता शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण या सृष्टीवर झाले आहे. ते अतिशय स्नेहपूर्ण शब्दात आत्मारूपी मुलांना समजावून सांगत आहेत, ''प्रिय वत्सांनो, जर तुम्ही तुमचे आत्मारूपी दीपक माझ्या दिव्य ज्योतिने प्रज्वलित कराल तर लवकरच या सृष्टीवरील अज्ञान अंधकार दूर

पान नं. ३३ वर



# अंतिम पेपरमध्ये पास व्हायचे असेल तर दीर्घकाळाचा अशरीरी बनण्याचा अभ्यास हवा

– राजयोगिनी ब्र. कु. गुलजार दादीजी

अशरीरी अवस्था म्हणजे काय? अशरीरी बनणे म्हणजे शरीरातून गायब होणे नव्हे; तर **शरीरात असूनही शरीराचे भान न राहणे म्हणजे अशरीरी अवस्था होय. याच्यासाठी दीर्घकाळाचा अभ्यास हवा. तेव्हाच योगासाठी बसता क्षणीच आपण अशरीरी होऊ शकू.** सध्या सेवेचा विस्तार खूप वाढला आहे याकरिता विस्तारातून बाहेर पडून एकदम अशरीरी होण्यासाठी वेळ लागतो. परंतु शेवटच्या क्षणी एक सेकंदात अशरीरी व्हायला लागेल. त्यावेळेस जर आपण ठरवलं; की आता आपण अभ्यास करूया– आत्मिक अवस्था बनविण्याचा की – मी आत्मा आहे, मी आत्मा आहे. तर आपण योद्ध्यांच्या लीस्ट (यादी) मध्ये येऊ. मग सूर्यवंशी कसे बनणार? म्हणून आत्तापासूनच अशरीरी बनण्याचा अभ्यास केला पाहिजे.

जसं सुरुवातीला आम्ही पुरूषार्थ करण्याकरिता वेगळे–वेगळे ग्रुप बनविले होते. उदा. एक मनोहर पार्टी, एक डिवाइन पार्टी, एक सुप्रीम पार्टी... अशीच आमची नावं पण ठेवली गेली होती. योग या विषयात आपली पार्टी कशी पुढे जाईल याचा आम्हाला उत्साह असायचा. त्यामुळे आम्ही ऐकमेकांबरोबर योगाची स्पर्धा करीत असू. पण एकमेकांशी ईर्षा नव्हती. वेगवेगळ्या ग्रुपमध्ये बसून आम्ही रूह–रिहान (आत्मिक चर्चा) करीत असू. ती वेळ अशी होती की अशरीरी स्थितीचा अभ्यास खूप लवकर व सहज व्हायचा. सध्या सेवेचा विस्तार वाढल्यामुळे वेळ लागत आहे. एक सेकंदाचा अभ्यास सुद्धा खूप प्राप्ती करवून देऊ शकतो.

ब्रह्माबाबा पण अमृतवेळेच्या योगानंतर पांडव भवनच्या अंगणात जिथे एक छोटी टेकडी होती, त्या टेकडीवर उभे राहून आमच्याकडून योग करवून घेत असत. **ब्रह्माबाबांची दृष्टी पडताच आम्ही एकदत अशरीरी होऊन जात असू. आमच्यासमोर बाबा एकदम लाईट हाऊस (प्रकाशस्तंभ) बनून उभे रहायचे. आम्ही खाली पायऱ्यांवर उभे रहात असू. बाबा आम्हांला अशी दृष्टी द्यायचे की आम्ही देहभान विसरून जात असू.** कळायचं पण नाही की आम्ही कुठे उभे आहोत. आमच्या आजूबाजूला कोण उभे आहे. एकदम लाईट हाऊस – बाबा पण, आम्ही पण ... हा अभ्यासच शेवटच्या क्षणी कामाला येईल. अभ्यासाशिवाय आपण पास कसे होणार? **शेवटी शेवटी अनेक प्रकारच्या परिस्थिती आपणास घेरतील अशा वेळी हा अभ्यासच उपयोगी पडेल आणि हा अभ्यास आता नाही केला तर मग केव्हा करणार?** शेवटी जर आपण बाबांकडे मदत मागत बसलो तर बाबा मदत करतील काय? त्यावेळी नुसतं 'बाबा बाबा' करून काय उपयोग? त्यावेळी बाबांसमोर नुसती तक्रार करून काय उपयोग? तक्रार करणाऱ्याला बाबांची मदत कशी काय मिळणार? म्हणूनच योगभट्टी मध्ये बसणे आवश्यक आहे. योग तपस्या भट्टी कुणीही चुकवता कामा नये. भट्टी मुळे आपल्याला बाबांचे एक्स्ट्रा बळ (शक्ती) मिळते. हे भट्टीचे कार्यक्रम सुद्धा बाबांनीच ठरवून दिलेले असतात. म्हणून यामध्ये बाबांकडून विशेष ताकद मिळते परंतु त्यानंतर आपण अभ्यास मात्र निरंतर केला पाहिजे. बाबांनीच ठरवून दिलेले योग तपस्येचे कार्यक्रम आपणांसाठी जणू एक लिफ्ट (Lift) चे काम करतात. त्यामुळे अनेक प्राप्ती सहज होऊ शकतात. हो, पण त्यासाठी उमंग–उत्साह कायमस्वरूपी असणे महत्त्वाचे आहे. कायमस्वरूपी उत्साह नसेल तर प्राप्ती देखील कायमस्वरूपी होणार नाही. जसे एखादी घटना मग ती दुःखद असो वा सुखद आपल्या मनावर बिंबते. ती पुसणं अशक्य असतं. एखाद्याने शरीर सोडलं असेल तर, कुणी ती घटना खूप मनाला लावून घेतली असेल तर ती त्याला विसरणे अशक्य असते. तसेच जोपर्यंत आपण

**जर आपण ठरवलं आता आपण अभ्यास करूया– आत्मिक अवस्था बनविण्याचा की – मी आत्मा आहे, मी आत्मा आहे. तर आपण योद्ध्यांच्या लीस्ट (यादी) मध्ये येऊ. मग सूर्यवंशी कसे बनणार? म्हणून आत्तापासूनच अशरीरी बनण्याचा अभ्यास केला पाहिजे.**

अशरीरी बनण्याचा अभ्यास करणे मनापासून स्वीकारत नाही तोपर्यंत तो फलदायक होणार नाही.

एकवेळा बाबांनी खूप चांगली गोष्ट सांगितली होती, बाबा म्हणाले होते - मुलांना वाटतं आपण खूप सेवा करतो, सेवेची जबाबदारी सांभाळतो. पण बाबा म्हणतात - मुलांनो सेवा करणं, जबाबदारी सांभाळणं काही मोठं काम नाही. ते तर प्रत्येकालाच करायचं आहे. अज्ञानी लोक तर अनेक मोठ-मोठ्या कंपन्या सांभाळतात. हजारों लोकांना नियंत्रणात ठेवतात. तुम्ही तर ज्ञानी आहात. तुम्ही कार्यभाग सांभाळलात तर त्यात काय मोठंसं? परंतु ज्ञानी आणि अज्ञानीमध्ये मोठा फरक आहे. **आपण ज्ञानी दुहेरी सेवा करतो. एक तर एखादी सेवेची जबाबदारी सांभाळतो. दुसरे ती जबाबदारी सांभाळताना आध्यात्मिक वातावरण देखील बनवतो. कर्म देखील बळ देतं त्याचबरोबर श्रेष्ठ, शुद्ध वातावरण देखील बनविण्याचे पुण्य मिळते.**

पुढे बाबा हेही म्हणायचे - असे समजू नका की हे कार्य पार पाडणं म्हणजे एक ड्युटी आहे. त्यातच आमची बुद्धी व्यस्त असते. परंतु दुनियेमध्ये देखील ड्युटी पार पाडणारे अनेक आहेत. त्यात काय मोठे ? मोठेपण आहे ते म्हणजे डबल कमाई करण्यात. ज्यामुळे आपणास विशेष शक्ती मिळते. आपल्याला बाबांची मदत आहे. त्यांना तर तीही मिळत नाही. काही लोकांना भक्तिमार्गात देखील बाबांची अल्पकाळाची मदत मिळते. पण सर्व लोक काही भक्त नाहीत ना, तरीही कार्य करतच आहेत. ड्युटी सांभाळत आहेत. त्यात विशेष असे काही नाही. बाबा म्हणतात, ड्युटी सांभांळताना ती जर अचूकपणे व्यवस्थित पार पाडली तर डबल कमाई होऊ शकते. बाबांचीसुद्धा डबल शक्ती मिळते. **बाबांचे कार्य निमित्त बनून केल्यामुळे, बाबा आपल्या बुद्धीला स्पर्श करून ते कार्य अचूक करवून घेतात. कारण बाबा बुद्धिमानांचे देखील बुद्धिमान आहेत. सारी बाबांची कमाल आहे. सर्व काही बाबाच करतात आणि भाग्य मात्र आपलं बनवितात. मेहनत स्वतः करतात आणि फळ मात्र मुलांना देतात.** बाबा निराकार असल्यामुळे आपणास एक्स्ट्रा मदत करतात आणि आपण विशेष आहोत म्हणून आपल्याकडून विशेष कार्य करवून घेतात.

वर्तमान काळ पाहता सगळीकडे वातावरण विकारी होत चालले आहे. मोठ्या शहरांमध्ये प्रदूषण वाढत आहे. बिचाऱ्या बाहेरच्या लोकांना देखील प्रश्न आहे की - दोन चार वर्षांने काय होणार? परंतु आपण ज्ञानी असल्यामुळे आपणास माहीत आहे - ही परिवर्तनाची वेळ आहे. महापरिवर्तन होणार आहे. खरोखर बाहेरचे वातावरण एवढे बिघडले आहे. जेवढे मोठे शहर तेवढी तेथे वाईट परिस्थिती आहे.

बाबा सारखे सांगत आहेत - मुलांनो आता अचानक काहीही होऊ शकते. एवररेडी रहा. कोणतीही परिस्थिती विचारून येणार नाही. तारीख फिक्स नाही. ज्योतिषांनी कितीही सांगितले तरी बाबांनी अंतिम तारीख अजून घोषित केली नाही. ना कुणाला स्वतःची अंतिम वेळ सांगितली, ना संपूर्ण सृष्टीच्या अंतिम वेळेची तारीख सांगितली. कोणाचेही तिकीट केव्हाही निघू शकते.

ब्राह्मण परिवारात देखील समाचार ऐकायला मिळत आहेत की, अचानक काहीही होऊ शकते. याक्षणी देखील अचानक काहीही होऊ शकते. ब्राह्मण परिवारात देखील आता अचानक समस्या वाढू लागल्या आहेत. ब्राह्मण परिवार देखील छोटा नाही. भारत आहे, भारताबाहेर विदेशात बाबांची मुले आहेत. **आता वेळ अतीकडे जात आहे. अशावेळी आपण मास्टर रचयिता पॉवरफुल (शक्तिशाली) नसू तर वेळ (रचना) पुढे निघून जाईल. आणि आपण रचयिता मागे राहू - हे योग्य आहे काय? म्हणून आपली धारणा खूप खूप मजबूत असली पाहिजे. या गोष्टीखाली अण्डरलाइन करा.** समजा, यामध्ये कोणी म्हणेल की आम्ही प्रयत्न करू, लक्ष देऊ, असे म्हणणारे संशयबुद्धी आहेत. प्रयत्न करू असं तरी का म्हणायला हवे? मला करायचेच आहे हा निश्चय पाहिजे. प्रयत्न करू हा शब्द संशयास्पद आहे. संशय उत्पन्न झाला तर विजय कसा मिळणार? बाबा म्हणतात, स्वतःमध्ये प्रथम निश्चय हवा. कित्येकांचा केवळ बाबांमध्ये निश्चय आहे की आम्ही कल्पापूर्वीची बाबांची मुलं आहोत, कल्पानंतर बाबा पुन्हा भेटले आहेत. बाबांमध्ये निश्चय १०० टक्के काय, पण त्याहीपेक्षा जास्त आहे. परंतु स्वतःमध्ये निश्चय अजिबात नाही, म्हणजे संशय आहे. तर याचा अर्थ स्वतःच स्वतःच्या पायावर कुऱ्हाड घालून घेण्यासारखे आहे. मग हा संशय स्वतःच स्वतः लाच खातो आणि कोणाला खाणार? म्हणून कमजोर संकल्प करू नका

पान नं. ११ वर

# आत्मिक सौंदर्य हेच खरे सौंदर्य..

– **ब्रह्माकुमार हेमंतभाई. शांतिवन**, आबूरोड

आदर्श ग्रंथ रामायणातला हा उद्बोधक प्रसंग आहे. वनवासाच्या दिवसात भगवान श्रीराम हे श्रीसीता व लक्ष्मणासवे वनगमन करीत होते. चहूकडे निसर्गराजा नानाछटांनी सौंदर्याचे जणू प्रदर्शन करीत होता. वृक्षवल्ली वनराई प्रकृतीला नावीन्यानं सजवित होती. सरितेचे निर्मल नीर झरझर वाहत होते. सरितेच्या निर्मल जलातून जात असता आपल्या सुंदर पायांवर माता सीतेचे लक्ष गेले. तेव्हा जानकीजींनी श्रीरामास हसत–हसत प्रश्न केला, '' स्वामी, चरण कुणाचे सुंदर, तुमचे की माझे?'' तसे बघितले तर जानकीचे चरण श्रीरामापेक्षा दिसायला सुंदरच होते. तेव्हा अशा ह्या मिश्किल प्रश्नाचं स्वतः उत्तर न देता, श्रीरामांनी लक्ष्मणास प्रश्नाचे उत्तर देण्यास इशारा केला. लक्ष्मणाला उत्तर देणं सोपं नव्हतं. जर जानकीजींचे चरण सुंदर म्हणावे तर श्रीरामांचा अपमान होईल व श्रीरामाचे चरण सुंदर म्हटले तर सीतेचे चरण सुंदर नाहीत हे खोटे बोलले जाईल. **म्हणून लक्ष्मणाने युक्तियुक्त उत्तर देत म्हटले, '' दादा, चरण तर त्याचे सुंदर, ज्याचे आचरण सुंदर (आ+चरण = आचरण) '' खरंच आचरणाची सुंदरता खरी सुंदरता नाही काय? जेव्हा मानव आत्म्याचे आंतरिक दैवीगुण आचरणाद्वारे प्रकट होतात, तेव्हाच मानव खऱ्या अर्थाने सुंदर दिसतो वा भासतो. खरी सुंदरता सद्‌गुण संपन्न चरित्र निर्माणात आहे.**

पण किती आश्चर्याची गोष्ट? आजच्या युगात शारीरिक सुंदरतेलाच खरे सौंदर्य मानले जाते. स्वतःकडे दुसऱ्यांना आकर्षित करण्यासाठी कृत्रिम सौंदर्य प्रसाधनांचा वापर करून नट्टापट्टा करणे, इतरांच्या नजरा स्वतःकडे खेचणारे रंगबेरंगी वस्त्र परिधान करणे व आकर्षित करणारे अलंकार, आभूषण, दाग दागिन्यांनी सजणे, देहाला साफ स्वच्छ ठेवणे ही तर झाली अल्पकाळाची क्षणिक दैहिक सुंदरता. परंतु ह्या विनाशी शरीर सुंदरतेच्या तुलनेत आत्म्याचे गुण (ज्ञान–पवित्रता–सुख–शांती–प्रेम–आनंद, शक्ती इत्यादी) जेव्हा व्यवहारात दिसू लागतात. तेव्हा तेच खरे आंतरिक सौंदर्य, उत्तम आचरणाद्वारे प्रकट होते. आत्मिक गुणांनी भरपूर असलेले, आंतरिक सौंदर्य सदाकाल टिकणारे अविनाशी सौंदर्य होय.

वरवर पहाता देहाचे रूपरंग कितीही देखणे असो, व्यक्तीचे रूप लावण्य चंद्रालाही लाजविणारे असो, किंवा पहाता क्षणीच पाहणाऱ्याला वेड लावणारे आकर्षक व्यक्तिमत्त्व असो, परंतु जर व्यक्तीच्या व्यवहारांत शालीनता, सभ्यता, सज्जनता व सहृदयता नसेल, व्यक्ती नेहमीच अंतःकरणाला टोचणाऱ्या टीका टिपणी करीत असेल. काळजाला भेदणारे बाभळीच्या काट्यासारखे कटू वचन बोलत असेल, प्रत्येक शब्दासोबत शिवीगाळ करून दुसऱ्याची अब्रू लुटत असेल, व्यक्तीची दृष्टीवृत्ती चंचल असेल, तो नेहमीच कामुक चेष्टा करण्यास उतावीळ होत असेल, पदोपदी क्रोधाग्निने लालपिवळा होत असेल, तेव्हा अशा अभद्र, अशिष्ट,अश्लील, आचरणाने एखादा दिसायला साजरा गोजरा रूपवान सौंदर्यवान ही कुरूप दिसू वा भासू लागतो.

ह्या उलट गंगेच्या पवित्र जलतरंगासारख्या ज्याच्या मन सरोवरात जनकल्याणाच्या विचार लहरी उठत असतील, ज्याच्या वाणीत मधासारखा गोडवा असेल, ज्याच्या प्रत्येक शब्दा–शब्दात साखर पेरली असेल, ज्याचे प्रत्येक कर्म सर्वांना सुख देण्यासाठी समर्पित असेल, ज्याची पाऊले नेहमी पुण्यकर्माच्या पथावर निरंतर अग्रेसर होत असतील. ज्याचे जीवन त्यागाचे जिवंत उदाहरण असेल, जो जीवनाला लोककल्याणाचा महायज्ञ मानून, त्यात स्वतःच्या तन–मनधनाची आहुती टाकत असेल, **जो ईश्वरीय ज्ञानाच्या मनन चिंतनात सदा निमग्न असेल, जो प्रेमळ प्रभूच्या आठवणीत नित नियमित निरंतर रममाण होत असेल. ईश्वरीय गुणांची धारणाच ज्याचा धर्म असेल, सेवा हाच ज्याचा श्वास असेल, जो योगाग्नित तापून खऱ्या सोन्यासाखा उज्ज्वल बनला असेल, म्हणजे जो खरा त्यागी, तपस्वी व सेवाधारी असेल; असा कर्म–धर्मनिष्ठच जगात सुंदर मानला जातो.** असाच मनुष्य आत्मिक सुंदरतेपोटी पूजला जातो. त्याची आत्मिक गुणमूर्त सौदर्यांची रुहानी छटा, हृदयावर अमिट छाप सोडते. आत्मिक सुंदरताच सत्यम्–शिवम्–सुंदरम् ईश्वराशी मिलन करविते.

जरी दिसायला असा महात्मा एवढा गोरा गोमटा सुंदर नसेलही किंवा ह्यापलीकडेही त्याचे रूप वा रंग खूपच कुरूप असेल, चेहरा इतका आकर्षक नसेलही. तरीही तो सद्व्यवहार पवित्रता, शुद्धता, श्रेष्ठता, दिव्यता, भव्यता इत्यादी गुणांनी भरलेला असेल. असा सेवाभाव व सहकाराच्या श्रृंगाराने सजलेला महात्मा सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतो. महात्मा गांधी, मदर टेरेसा ह्या जगविख्यात विभूतींचे देहिक रूप एवढे आकर्षक कुठे होते; परंतु सत्याचे परमतेज, अहिंसेचा अनुपम अलंकार व प्रेमाचा श्रृंगार धारण केल्याने मोहनदास करमचंद गांधींना साऱ्या जगाने 'महात्मा' ही सुंदर उपाधी दिली. दया, करुणा व सहानुभूती इत्यादी सद्गुण धारण करणाऱ्या टेरेसांना जगाने ''मदर'' म्हटले. विश्वात सर्वात सुंदर ती जननी ना ! मदर टेरेसांनी व्यक्तिमत्त्वात लपलेले मातृवत वात्सल्याचे दर्शन निज कर्मात करविले व संपूर्ण विश्वाला सेवाभाव, सहानुभूतीच्या सौंदर्याचे दिव्यदर्शन दिले.

शिवाजी महाराजांच्या चारित्रिक सुंदरतेची साक्ष देणारा हा महान प्रसंग. एकदा शिवाजी महाराजांचा सेनापती मुगल सेनेस पराभूत करून, भारी मुल्यवान लवाजम्यासोबत महाराजांसमोर उपस्थित झाला. सेनापती आपल्या सोबत एक पालखी घेऊन आला. महाराजांना खुश करण्यासाठी पालखीतून अति सुंदर मुगल पुत्रवधूस उपस्थित करत, सेनापती उत्साहाने महाराजांना म्हणाला, 'महाराज, मी मुगलांना हरवून हा सुंदर नजराणा आपल्यासाठी आणलाय' त्या सुंदर स्त्री पहाता क्षणीच महाराज उद्गारले, 'जर आमुच्या माता एवढ्याच सुंदर असत्या तर आम्हीही एवढेच सुंदर निपजलो असतो.' एका कवीने याविषयी सुंदर काव्यही रचलय. ''

**'जर का असती आमुची आई, सुंदर रूपवती ।**
**आम्हीही सुंदर झालो असतो, वदले छत्रपती ।।'**

आणलेली भेट स्वीकार करून महाराज खूप खुश होतील, अशी सेनापतीची अपेक्षा खोटी ठरली. महाराज खुश होण्याऐवजी सेनापतीवर खूप रागावले. नंतर शिवाजी महारालांनी त्या मुगल पुत्रवधूस सन्मानासहित परत पाठविले. छोटे तन पण सुंदर मनाचे धनी अशा शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र सर्वांसाठी आदर्श व अनुकरणीय असे आहे.

शरीराची क्षणभंगुर सुंदरता व्यक्तीला मोहजाळात फसवते, मनुष्यास दैहिक आसक्तित अडकविते आणि स्वर्णमृगाच्यासमान चमकविणाऱ्या चर्माकर्षणाच्या (चर्म आकर्षण– त्वचेचे आकर्षण) मागे–मागे भटकवते. कृत्रिम प्रसाधनांनी शरीराची लोभस गोंडस सुंदरता पहिल्या क्षणी तर कुणालाही आकृष्ट करते, मनाला मोहित करते व बुद्धीस सुंदरतेच्या लोभाने लुभावते. व्यक्तीला भ्रमित करते आणि शेवटी भ्रमजालात गुरफटल्याने विवेकावर अज्ञानाचा पडदा टाकते. जिथे ज्ञानरूपी तिसरा नेत्र आत्म्याचे असली सौंदर्य पाहू शकत नाही, तिथे आकर्षणाची माया दैहिक सुखाच्या दिखाव्याद्वारे आत्म्याला फसविते आणि मग मनात जन्म घेऊ लागतात विषय सुखाच्या भोगविलासी इच्छा, कामना. ह्याच कामना कामुकतेच्या अधीन करतात व कामुकतेची नशा व्यक्तीकडून नर्काच्या द्वारापर्यंत नेणारे अनेक कुकर्म करविते आणि मग होतो शेवटी सर्वनाश....

आज कामुकतेमुळे होणाऱ्या समाज व संसाराच्या महाविनाशचा कोण साक्षी नाही? तरीही जग सौंदर्य प्रसाधनांच्या साधन सामग्रीच्या संग्रहाचे समर्थन करीत आहे. वर्तमान पत्रे, रेडिओ, व टी.व्ही. सारख्या प्रसार माध्यमांमध्ये दैहिक आकर्षणाच्या आगीत तेल ओतणाऱ्या जाहिरातींचा जणू महापूरच उसळ्या मारताना दिसतो. भलेही आधुनिक साधनांनी नाना इंद्रियलोलूप सुखांची आज वृष्टी केलीय; परंतु आज आवश्यकता आहे, आत्मिक जागृतीद्वारे जनता जनार्दनास जागे करण्याची, ज्ञानदीप हाती घेऊन हृदयी अध्यात्माचा प्रकाश पसरविण्याची. जेव्हा आत्मिक सौंदर्याचा साक्षात्कार होईल तेव्हाच नकली क्षणिक दैहिक सुंदरतेवरून दृष्टी हटेल व मना–मनातील मिथ्या, मायावी मनोकामना मिटतील. आंतरिक सौंदर्याच्या प्रभावानेच स्वर्गीय सुखाचा सागर उसळू लागेल.

**तर मग चला, उशीर कशाला करता, आपण सारेच आत्मिक गुणांची कास धरूया, आंतरिक सौंदर्य वाढवूया व खऱ्या सौंदर्याने आपले अंतर्बाह्य रूप सत्यम्–शिवम्–सुंदरम् सारखे सुंदर बनवून, तना–मनाला सजवूया व स्वर्गीय स्वाद चाखूया...**



# अज्ञान, अंधश्रद्धा व धर्मग्लानी नष्ट करूया !

आत्मस्मृतीचा अंत होता,
आरंभ होतो देहाभिमान व अज्ञानाचा ।
विदेही परमेशाला देहधारी मानणे,
अंधःकार हा अंधश्रद्धेचा ।।१।।

सर्वगुण संपन्न देवतांना
दूषण लावणे अज्ञान असते घोर ।
सतोप्रधान श्रीकृष्णालाही
सकल जन म्हणती माखनचोर ।।२।।

महाअज्ञान हेची व्याप्त जाहले,
परमात्म्याला सर्वव्यापी मानिले ।
ब्रह्मावत्सांनी मात्र तो ब्रह्मलोकवासी
असल्याचे घोषित केले ।।४।।

देव दानवांचे हिंसक युद्ध
कोणत्याही युगात होत नसते ।
उभयतांचे युद्ध दर्शवूनी,
अज्ञान मात्र प्रगट होत असते ।।५।।

अहिंसक देवतांना हिंसक मानणे,
अज्ञान हे अंधश्रद्धेचे ।
'कृष्णानेही असुरांचे पारिपत्य केले'
विधान हे धर्मग्लानीचे ।।६।।

कल्पित असुरराजाला
श्रीकृष्णाचा मामा मानणे अज्ञान हे किती?
'गोपींचा वस्त्रहरण कर्ता' ऐसे बोलूनी
कृष्णग्लानी जाहली अति ।।७।।

श्रीकृष्णानेच प्रथमतः गीताज्ञान दिधले
मान्यता ही सकलांची ।
'मान्यता ही तर घोर अज्ञानाची'
बरसली वाणी शिवबाबांची ।।८।।

अज्ञानातूनी धर्मग्लानी,
धर्मग्लानीतूनीच होते परमात्म अवतरण ।
ह्याची अवतरणाने धर्मग्लानीचे
होते पूर्णतः निराकरण ।।९।।

कलियुगी अंधश्रद्धा व अज्ञान
पराकोटीला जावूनी पोहचले ।
तेहतीस कोटी देवांचे वास्तव्य
गोमातेच्या उदरी मानिले ।।१०।।

अंधश्रद्धा व अज्ञान,
दोन बाजू ह्या असती, एकाच नाण्याच्या ।
खोटे हे एक नाणे, मनरूपी खिशात असते
पथभ्रष्ट आत्म्यांच्या ।।११।।

पथभ्रष्ट करणाऱ्या अज्ञानाला
तिलांजली देण्याचे व्रत घेवूया ।
संगमयुगावरी परमात्मज्ञानाचा
दिपोत्सव साजरा करूया ।।१२।।

पवित्र होवूनी निश्चय करूया
भारताला स्वर्ग बनविण्याचा ।
परमात्मा तुम्हासी वारसा देईल
एकवीस जन्म सुखशांतीचा ।।१३।।

परमात्म निर्मित स्वर्गात ना अंधश्रद्धा,
ना धर्मग्लानी, ना अज्ञान ।
देवात्म्यांच्या अपार सुखशांतीचे
मर्म जाणील काय विज्ञान ।।१४।।

मर्म हे कोणी जाणो वा न जाणो,
मजला ते जाणायचे आहे ।
ऐसा संकल्प करूनी, सर्व आत्म्यांना
ज्ञानमंदिरी ह्या यायचे आहे ।।१५।।

ह्याची ज्ञानमंदिरी भारताचा
सुवर्ण इतिहासही जाणावा ।
परमात्म ज्ञानाच्या दिव्य प्रकाशाने
अज्ञान अंधःकार दूर करावा ।।१६।।

**- ब्रह्माकुमार जगदीश दीक्षित, पुणे.**

# जसे कर्म तसे फळ

**– ब्र. कु. सोमनाथ,** बोपोडी (पुणे)

या सृष्टी रंगमंचावर दोन गोष्टी निरंतर चालत आल्या आहेत त्या म्हणजे कर्म आणि फळ. निसर्गाचा नियम आहे, जे पेराल तेच उगवेल. जीवन चक्राचे विधीविधान खूप रहस्यमय बनले आहे. पाप आणि पुण्य या दोनच गोष्टींच्या आधारे संसाराचा खेळ चालला आहे. पुण्याच्या आधारे सुख, शांती तर पापाच्या आधारे दुःख, अशांती प्राप्त होत असते. कर्माच्या आधारे पाप अथवा पुण्याच्या खात्यावर जमा खर्चाप्रमाणे आपला हिशोब तयार होत असतो. कर्माची गहन गती अति सूक्ष्म आहे.

कालचक्र, ऋतुचक्र, निरंतर आपले कार्य बजावित आहेत. दिवसामागून रात्र आणि रात्रीमागून दिवस अथकपणे चालूच आहे. सूर्य, चंद्र, तारे, निसर्ग यांनी कधीही विश्रांती घेतली नाही. सूर्याला कोणी एका जागेवरून दुसऱ्या जागेवर ढकलत नेत नाही, पृथ्वीला कोणी गरागरा फिरवीत नाही, चंद्रही त्याचे कार्य व्यवस्थित करतो. हे कोणी व्यक्ती आपल्या रिमोटद्वारे एका जागी बसून फिरवीत नाही. हजारो वर्षापासून निसर्ग त्याचे कार्य अचूक रितीने करत आहे. हे थांबले तर जग थांबणार. अगदी तसेच कर्म आणि फळ हे निरंतर चालू आहे.

मनुष्य फक्त वर्तमानाच्या भौतिक सुखासाठी आपल्या नैतिक मूल्यांचा बळी देऊन, भ्रष्टाचाराचे बीज पेरतो. पैसा, प्रॉपर्टी, साधने यामध्ये सुख समजतो. पुढचे कोणी बघितले, जे होईल ते बघता येईल, आता तर फायदा मिळतो ना? सगळेच जण करतात, मी केले तर काय फरक पडणार, अशा कुविचारांच्या चक्रात अडकतो. पण पापाच्या बीजांतून सुखाची फळे कशी येणार? ती भोगावीच लागतात. या जन्मी नाही तर पुढच्या जन्मी अवश्य मिळतात. आपण पाहतो की जन्मतःच कोणाच्या मुखात सोन्याचा चमचा तर कोणाचा जन्म अठरा विश्वे दारिद्र्य असलेल्या ठिकाणी होतो. कर्म हे आपल्या सावली प्रमाणे जन्मोंजन्मी आपला पाठलाग करत असते. महाभारतातील भीष्म पितामह हे देखील या चक्रातून सुटले नाहीत. सात जन्मापूर्वी त्यांनी एका सापाला रस्त्यातून बाजूच्या काटेरी झाडावर फेकले. त्यावेळी सापाच्या पूर्ण अंगामध्ये काटे घुसले होते. त्याचा परिणाम अंतसमयी त्यांना अर्जुनाच्या बाणांच्या शय्येवर राहून प्राणत्याग करावा लागला; अशी महाभारतात कथा आहे.

मनुष्य जन्म हा इतर सर्व प्राण्यांमध्ये श्रेष्ठ जन्म आहे. त्याला त्याच्या पाप पुण्याची फळे भोगायला इतर योनीमध्ये जावे लागत नाही. जसे बीज तसे फळ याप्रमाणे त्याला मनुष्य योनीतच पुनर्जन्म मिळत असतो. आंब्याच्या झाडाला कधी केळी येत नाहीत. आजचे काही पाळीव प्राणी देखील माणसांपेक्षा जास्त सुखी दिसतात. त्यांना काहीही कष्ट न करता तीनही वेळी जेवण, फिरायला गाडी, रहायला उत्तम घर मिळते. प्राण्यांपेक्षा मनुष्य योनीतच भयंकर यातना आहेत. आपल्याला रोजच्या जीवनचक्रामध्ये विचित्र घटना ऐकायला मिळतात. एखाद्या भयंकर अपघातातून फक्त एखादीच व्यक्ती वाचते की तिच्या केसाला सुद्धा धक्का लागत नाही. काळ आला होता पण वेळ आली नव्हती; तर कोणी म्हणतो पुण्याईचा दोर बळकट होता. शेवटी पुण्यच कामाला येत असतं. आपण सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत जे काही कर्म करतो त्याचे सूक्ष्मरूपाने चित्रीकरण होत असते. आपले नशीब हे कोणी सटवी लिहित नसून, ते आपल्या कर्मातूनच लिहिले जाते. जर तुमचे जीवन दुःखी,

▸ पान नं. ३० वर



**पापाच्या बीजांतून सुखाची फळे कशी येणार? ती भोगावीच लागतात. या जन्मी नाही तर पुढच्या जन्मी अवश्य मिळतात. आपण पाहतो की जन्मताच कोणाच्या मुखात सोन्याचा चमचा तर कोणाचा जन्म अठरा विश्वे दारिद्र्य असलेल्या ठिकाणी होतो. कर्म हे आपल्या सावली प्रमाणे जन्मोंजन्मी आपला पाठलाग करत असते.**

लेखांक-२० वा

# ईश्वरीय कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

– दिवंगत वरिष्ठ भ्राता रमेश शाह (मुंबई) यांच्या लेखणीतून

प्राण प्रिय अव्यक्त बापदादा, आपण वर्तमान दुनियेत यज्ञ कारभार कसा करावा याचे तसेच येणाऱ्या नवीन दुनियेसाठी सुध्दा शिक्षण देत आहेत. जेणे करून आपण २५०० वर्षे दोन युगांमध्ये संपूर्ण विश्वाचा कारभार अटळ, अखंड व निर्विघ्नपणे चालवू शकू. ही आपली फार मोठी जबाबदारी आहे. ती पार पाडण्यासाठी आपल्याला यज्ञ कारभार वा राज्य कारभार करण्याचा पुरूषार्थ करावा लागतो. यासाठी मी Master of Divine Administration (MDA) च्या विषयी लेख लिहिले आहेत.

भारतात सामाजिक, आर्थिक तथा धार्मिक कार्यव्यवहार करणाऱ्या अनेक संस्था आहेत. भारत सरकारच्या या वर्षाच्या बजेटमध्ये सांगितले आहे की, भारतात इन्कम टॅक्स भरणाऱ्या संस्था २०१३–१४ मध्ये १,०६,४४३ इतक्या होत्या. सन २०१४–२०१५ मध्ये ३० नोव्हेंबर पर्यंत ९९,०७६ संस्थांनी इन्कम टॅक्स रिटर्न भरलेले आहे. या संस्थांनी धार्मिक आणि धर्मदाय (Religions आणि Charitabte) कार्यावर २०१३–१४ मध्ये २,२५,४७२ करोड रुपये खर्च केले आहेत

त्यापूर्वीच्या वर्षी याच संस्थांनी २,००,२७४ कारोड रुपये खर्च केले. ट्रस्ट, सोसायटी, फाऊन्डेशन इ. संस्थांसाठी दानशूरांना देणगी दाखल ८०G अंतर्गत जी सवलत मिळते, ती एकूण सवलत २०१३–१४ मध्ये १११२.६० करोड रुपये आणि त्याअगोदरच्या वर्षी ८६२.६० करोड होती.

सन २०१३–१४ मध्ये धार्मिक आणि धर्मदाय कार्यांवर जो २,२५,४७२ करोड रुपये खर्च झाला होता. तो भारत सरकारच्या राष्ट्रीय मिळकतीचा (GDP चा) २% होता. म्हणजे भारत सरकारला इन्कम टॅक्सद्वारा जी आवक होत होती, तेवढाच खर्च या संस्था करीत होत्या. म्हणजे संस्थांचा कारभार इतका विशाल होता. त्या शिवाय भारत सरकारने सामाजिक सेवा आणि व्यवस्थांवर त्यावर्षी २५,५७२ करोड खर्च केला होता. म्हणजेच सरकारद्वारे जो खर्च झाला होता त्याच्यापेक्षा संस्थांनी अनेक पटीने धार्मिक व धर्मदाय कार्यासाठी खर्च केला होता. या सर्व गोष्टींतून लक्षात येते की, धार्मिक व धर्मदाय कार्यासाठी लोक किती खर्च करतात. तरीसुध्दा सरकारला प्रत्येक वेळी धर्मदाय संस्थांच्या कायदेशीर व्यवस्थेमध्ये परिवर्तन करावे लागते. कारण काही लोक धर्मदाय खर्चाच्या नावे आपला खर्च त्यामध्ये टाकत असतात, त्यामुळे धर्मदाय संस्थांचे नाव खराब होते आणि त्या कारणामुळे वर्तमान समयी धर्मदाय संस्थेचे कार्य व्यवहार करण्यासाठी इमानदार, निष्ठावान आणि मूल्यनिष्ठ व्यक्तिची गरज आहे.

माझ्या एका मित्राने आपल्या पत्नीच्या नावे एक छोटे हॉस्पिटल सुरू केले; परंतु हे हॉस्पिटल आपल्या शहरात न उघडता, आपल्या शहरापासून दूर ६० कि.मी अंतरावर दुसऱ्या शहरात उघडले. मी त्याला विचारले की, तुम्ही आपल्या शहरात का नाही सुरू केले? त्यावर तो उत्तरला की, मला मूल्यनिष्ठ, खरे आणि समर्पण भावनेने सेवा करणाऱ्या व्यक्तिंची आवश्यकता होती आणि ते जर आपल्या शहरात मिळाले नसते तर माझे नाव बदनाम झाले असते, आणि म्हणूनच मी निवडक व्यक्तिंनाच त्या हॉस्पिटलमध्ये घेतले आहे. तात्पर्य हेच की सत्यता आणि मूल्यनिष्ठतेने काम करणाऱ्यांची प्रत्येक ठिकाणी खूप आवश्यकता आहे.

मी एकदा भारतातील सर्वात धनाढ्य मंदिर तिरूपती बालाजी

**सरकारला प्रत्येक वेळी धर्मदाय संस्थांच्या कायदेशीर व्यवस्थेमध्ये परिवर्तन करावे लागते. कारण काही लोक धर्मदाय खर्चाच्या नावे आपला खर्च त्यामध्ये टाकत असतात, त्यामुळे धर्मदाय संस्थांचे नाव खराब होते आणि त्या कारणामुळे वर्तमान समयी धर्मदाय संस्थेचे कार्य व्यवहार करण्यासाठी इमानदार, निष्ठावान आणि मूल्यनिष्ठ व्यक्तिची गरज आहे.**

मंदिराचे मुख्य कार्याधिकारींना भेटलो होतो. ते मला म्हणाले की ब्रह्माकुमारीज्मध्ये ज्याप्रमाणे समर्पित वृत्तीचे सेवाभावी भाऊ-बहिणी आहेत. जे पवित्रतेच्या आधारे कार्यव्यवहार करतात, तसे आमच्याकडे नाहीत. त्यावेळेस त्यांचे जवळ १८,००० भाऊ-बहिणी होत्या परंतु कुणामध्येही सेवाभाव नव्हता. सर्व नोकरी करीत होते. त्यामागे त्यांचे तीन प्रकारचे उद्देश होते-

१. प्रत्येक महिन्याला किती पगार मिळेल?

२. वर्षाअखेरीस पगारात किती वाढ होईल?

३. वर्षाच्या शेवटी बोनस किती मिळेल?

**म्हणून ते म्हणाले की, आपल्या संस्थेतील भाऊ-बहिणींच्या समर्पण भावनेच्या आधारावर जो कार्यव्यवहार होत आहे, तो अद्भूत आहे. मी म्हटलं तुमच्या येथे शेठ आणि नोकर असा संबंध आहे आणि येथे ब्रह्माकुमारीज्मध्ये पिता आणि पुत्राचा संबंध आहे.**

हा संबंध जरूरीसुद्धा आहे. या संबंधानेच शिवबाबा आम्हा मुलांना शिकवितात आणि पुढे चालवीत असतात. दुनियामध्ये हा मुलगा जेव्हा बापाच्या गादीवर बसतो, जसे मोगल साम्राज्यात बाबरच्या गादीवर हुमायून, मग हुमायूनच्या नंतर अकबर, जहांगीर मग शाहाजहाँ आणि औरंगजेब बसले तसे येथे सुद्धा शिवबाबा २५०० वर्षांपर्यंत आम्हाला विश्वावर राज्य करायला पाठवितात. आपण मुले आहोत म्हणूनच आपल्या हातात विश्वाचे संचालन करण्याची सूत्रे सोपवितात. **म्हणूनच मी नेहमी म्हणतो की, हे विश्व विद्यालय होवनहार विश्व महाराजा, विश्व महाराणी बनणाऱ्यांना ट्रेनिंग देणारे, ट्रेनिंग सेंटर आहे. येथे स्वतः परमात्माच बाप बनून आम्हा मुलांना प्रशिक्षण देत आहे. आणि पिता बनून बाबाने मला जी शिकवण दिली त्यावर मी आतापर्यंत १३-१४ लेख लिहिले आहेत.**

आजसुद्धा मी एक गोष्ट लिहू इच्छितो. जेव्हा ट्रस्टची निर्मिती झाली तेव्हा बाबांनी मला पत्राद्वारे शिकवण दिली की, हा ट्रस्ट सेवार्थ आहे, यज्ञाच्या कार्यव्यवहारात मदत करण्यासाठी आहे. त्याचा कारभार वेगाने व्हायला हवा. म्हणून निर्णय करण्यात कधी दिरंगाई होता कामा नये. कारण उशीर केल्याने अनेकदा कामे बिघडतात.

प्रिय बाबांचे हे पत्र वाचतांच मला ब्रह्माबाबासोबतचा माझा अनुभव आठवला. एकदा मी रात्री आबू येथे बाबांबरोबर क्लासमध्ये बसलो होतो. बाबा रात्रीचा क्लास घेत होते. तेवढ्यात बाबाने ईशु दादीला म्हटले की, जगदीश बच्चेने जो लेख पाठविला आहे तो घेऊन ये. ब्रह्माबाबाने मला क्लासमध्येच म्हटले की, हा लेख वाच आणि आपले विचार बाबांना सांग.

दुसऱ्या दिवशी बाबांनी मला सकाळच्या मुरली क्लासमध्येच विचारले की, तू तो लेख वाचलास का? आपल्या सर्वांना माहितच आहे की, आपण बहाणेबाजी करण्यात कसे पटाईत आहोत. मी म्हटले, बाबा तुम्ही मला रात्री तो लेख दिला. त्यानंतर मी जाऊन झोपलो आणि सकाळी लवकर उठून तयार होऊन सरळ मुरली क्लासमध्ये आलो. त्यामुळे वेळच नाही मिळाला. त्यावर बाबांनी मला संपूर्ण क्लासमध्येच ठणकावले की, बच्चे बाबाबरोबर ठगी करू नकोस. तुझ्याजवळ पूर्ण वेळ होता. संपूर्ण रात्र तुझ्याकडे होती. बाबांचे कार्य रात्री जागूनसुद्धा केले पाहिजे. हे पांडव गव्हर्नमेंटचे कार्य आहे. पांडव गव्हर्नमेंटला नेहमी दक्ष राहून काम केले पाहिजे. मी म्हटले की, बाबा मी आत्ताच तो लेख वाचून घेतो आणि त्यावर मुरली क्लासनंतर त्वरित उत्तर देतो.

बाबा म्हणाले की, नाही बच्चे, आता वेळ गेली. मीच वाचून त्यावर उत्तर देईन. बाबाने तुला लेख वाचून उत्तर देण्यासाठी संधी दिली होती परंतु तू वेळ नाही मिळाला, असे सांगून संधी गमावली. तेव्हापासून मी ठरविले की, यज्ञ कारभार त्वरित व्हायला हवा. त्यात दिरंगाई होता कामा नये. माझ्याकडे जे ईमेल, पत्र येतात त्यांना मी २४ तासांच्या आत उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. मी थेट ब्रह्माबाबांकडून आदेश ऐकला की, बाबाच्या कार्यात कोणताही विलंब होता कामा नये. आणि जर मी विलंब केला तर बह्माबाबांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे, मला शंभर पटीने दंड भोगावा लागेल. आपल्या इतर भाऊ-बहिणींनी हा आदेश थेट ब्रह्माबाबांकडून न ऐकल्यामुळे, जर त्यांनी काही चाल-ढकल करीत, विलंब केला तर शंभर पटीने दंड नाही होणार. कारण ऐकीव गोष्टींच्या आधारावर आदेशाचा भंग होणार असेल तर शंभर पटीने दंड बसणार नाही.

या लेखाच्या माध्यमातून मी आपल्या दैवी परिवाराच्या बंधू-भगिनींना संदेश देऊ इच्छितो की, यज्ञ कारभारात बेफिकीर बादशहा

बनू नका. बाबा आपल्याला ईश्वरीय कारभार शिकवण्यासाठी निमित्त बनवित आहे. निमित्त बनण्याचा चान्स एकदाच मिळतो. जेव्हा आमच्या घरी मम्मा १८ महिने राहिल्या होत्या तेव्हा त्या म्हणत असत की बाबा प्रत्येकाला उन्नती करण्यासाठी संधी देत असतात. परंतु काही त्याचा स्वीकार करीत नाहीत. नंतर पश्चात्ताप करीत म्हणतात की, बाबा आम्हाला पुन्हा संधी द्या.

मला म्हणत असत की – Golden oppirtunities do not repeat. (सुवर्ण संधीची पुनरावृत्ती होत नसते.) आता नाही तर कधीच नाही. ज्याप्रमाणे इतिहासामध्ये जर आणि तर याला स्थान नसते. इतिहासामधील घटनांना मागे न्याहाळीत त्यात काही बदल करता येत नाही. इतिहास वास्तविकतेला धरून असतो. एकदा काही चूक झाली तर इतिहास त्याला माफ करीत नाही. उलट केलेल्या चुकांसाठी दंड भोगावा लागतो. ईश्वरीय कार्यव्यवहार हा परमात्म्याकडून शिकविला गेलेला कार्यव्यवहार आहे. म्हणूनच या लेखाद्वारे मी सर्व भाऊ–बहिणींना सांगू इच्छितो की, यज्ञ कारभारात त्वरित निर्णय घेता आला पाहिजे. हे पांडव गव्हर्नमेंट आहे. आणि आपण केवळ निमित मात्र आहोत. आपण समयबध्द (Punctual) राहिल्यास, त्वरेने कार्य केल्यास मग हेच संस्कार सत्ययुगी दुनियेसाठी घेऊन जाऊ. जर येथेच आपल्यामध्ये समयबध्दता (Punctuality) नसेल तर मग ती सत्ययुगातही नसेल. हे मग असेच होईल जसे आपल्याकडे ट्रेनचे तिकीट असेल परंतु वेळेवर न पोहचल्याने, ट्रेनच निघून जावी

**जर कमीकमजोरीमुळे आपण मिळालेल्या सोनेरी संधींना गमवित असू तर आपली प्रगती कशी होणार? तिला खीळ बसणार म्हणूनच जर आपण सत्यनिष्ठा, मूल्यनिष्ठा आणि समर्पित भावनेने सेवा केली तर त्याचे फळ कित्येक पटीने मिळते आणि आपण श्रेष्ठ भाग्य निर्माण करण्यासाठी निमित्त बनू शकतो.**

**(भावानुवाद : बी. के. जयश्री खिलारी, विक्रोळी, मुंबई.)**

▶ **पान नं. ४ वरुन**


की – नंतर पाहू, कसं होईल ? पुरुषार्थामध्ये हे संकल्प म्हणजे स्वतःचे नुकसान करणे आहे. आता तर **बाबा म्हणतात, मुलांनो पुरूषार्थामध्ये दृढ संकल्प करा की, मला करायचेच आहे. केवळ वरवरचा उत्साह दाखवून उपयोग नाही की, मी करेन, पाहीन, विचार करीन. एवढे बोलून बाबांना खुश करू नका. मी करणारच या शब्दाखाली अण्डर लाइन करा. काहीही झाले तरी चालेल परंतु तीव्र पुरुषार्थ करणारच.**

काही वेळा घोडेस्वार, प्यादे यांचे शब्द ऐकायला येतात की आम्ही पुरुषार्थ तर चांगला करतो. आम्ही स्वतःशीच संतुष्ट देखील आहोत पण आम्हाला कोणी महत्त्व देत नाही, ओळखत नाही. आम्हाला कोणी सीट देत नाही. अरे ! सीट तर सत्ययुगात मिळेल. तिथली सीट फिक्स आहे बाबांच्या घरी देखील सीट फिक्स आहे, ती म्हणजे बाबांच्या हृदयात. परंतु काही लोकांचा पायाच मुळात वाळूवर असल्यामुळे ते नेहमी डगमग होत रहातात.

समजा त्यांच्याबरोबर कोणी व्यवस्थित बोललं नाही – पाणी हवं का ? म्हणून विचारलं नाही तर लगेचच ते नाराज होतात.

अरे, मोठं बनणं म्हणजे उखळीत तोंड घालणं. मोठं बनायचं असेल तर कोणतीही भीती बाळगून चालणार नाही. पोजीशन किंवा सीट मिळवणं काही मोठी गोष्ट नाही. असं समजू नका की महारथी जे आहेत ते मजेत आहेत. त्यांच्यासमोर देखील अनेक प्रकारच्या समस्या येत असतात. त्यामानाने तुमच्या समोर तर केवळ मुंगी देखील येत नाही. महारथी समोर येणारी परिस्थिती किंवा समस्या ह्या समोर दिसत नाहीत. म्हणून असं समजू नका की ते आरामात राहतात. परंतु जेवढं मोठं बनणं तेवढं मोठमोठ्या परीक्षांना पास करणं होय. त्यामुळे त्यांच्यात शक्तीही तेवढीच असते. **हिंमत केल्याशिवाय बाबांची मदद मिळू शकत नाही. एक पाऊल आपण पुढे टाकू तेव्हाच बाबा हजार पाऊलांची मदत करतील. केवळ बाबांनीच सर्व केले पाहिजे आणि आपण काहीच करणार नाही असे होऊ शकत नाही. आपल्यालाही प्रथम एक पाऊल पुढे टाकावेच लागेल.**

**(भावानुवाद : ब्र. कु. छाया बहेन, मुलुंड (पूर्व) )**



# प्रसन्नतेचा आधार - संपन्नता

– **ब्र. कु. ज्ञानेश्वर** (धुळे)

मानव जीवनाचे लक्ष्य आहे – प्रसन्नता... परंतु प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी आत्म्याची संपूर्णता परम आवश्यक आहे. कित्येक जण प्रशंसेच्या आधारे प्रसन्नतेचा अनुभव करतात, परंतु अशा प्रकारची प्रसन्नता ही अल्प काळाची असते. **त्यामुळे स्थायी प्रसन्नतेचा आधार आहे – संपन्नता. आता चेक करा की मी सर्वगुण संपन्न बनलो आहे का? संपूर्ण निर्विकारी बनलो आहे का? संपूर्ण अहिंसक तसेच मर्यादा पुरुषोत्तम बनलो आहे का?** या सर्व गोष्टीत संपन्न बनल्यानेच आपण आपल्या जीवनात स्थायी प्रसन्नता अनुभव करू शकू. त्याचबरोबर जो स्वतः प्रसन्न आहे तो दुसऱ्यांशी देखील प्रसन्न राहील, सेवेच्या बाबतीतही प्रसन्न राहील. मुख्य म्हणजे सर्वात मोठी सेवा ही आपली प्रसन्नतेची मूर्ती करेल.

**संपन्न बनण्याचा आधार– आपली विशेषता ईश्वरी सेवेत लावा :**

**प्रत्येक ब्राह्मण आत्म्यामध्ये कुठली ना कुठली विशेषता जरूर आहे. तिला ओळखा व तिला ईश्वरी कार्याला लावा. म्हणजे आपोआप वृद्धी होत जाईल.** जसे एकावर जेव्हा आपण शून्य ठेवतो तेव्हा १० ही संख्या तयार होते. तिच्यावर आणखी एक शून्य ठेवले तर १०० ही संख्या तयार होते. जशी ही संख्या झपाट्याने वाढत जाते तशीच आपली एक विशेषता ईश्वरी कार्यात लावल्याने झपाट्याने वाढत जाते. फलस्वरूप आपण सर्व गोष्टींनी संपन्न बनत जातो व आपल्या जीवनात प्रसन्नता अनुभवाला येते.

याविषयी प्राणेश्वर बापदादा नेहमी भोली दादींचे उदाहरण देतात. भोली दादीमध्ये जी विशेषता होती, ती विशेषता त्यांनी ईश्वरी कार्याला लावली. त्यामुळे त्यांनी जरी मधुबनमधील भोलेनाथचा भंडारा सांभाळण्याची सेवा केली. तरी आपली विशेषता ईश्वरी कार्यात लावल्याने, त्या विशेष आत्मा बनल्या. त्यांना सर्व जण विशेष आत्म्याच्या नजरेने पाहत होते. त्यांनी कधी भाषण केले नाही परंतु त्या स्वतःशी, दुसऱ्यांशी व सेवेविषयी सदा प्रसन्न राहिल्या. या तिन्ही गोष्टीत प्रसन्न राहिल्याने प्राणेश्वर बापदादाही त्यांच्यावर प्रसन्न होते.

**सदा प्रसन्न राहण्यासाठी 'इच्छा मात्रम् अविद्या' बना.**

संगमयुगात आपण ब्राह्मण बनलो आहोतच; सदा संतुष्ट वा प्रसन्न राहण्यासाठी. 'इच्छा मात्रम् अविद्या' हे आपलेच गायन आहे, देवतांचे हे गायन नाही, कारण देवतांच्या जीवनात इच्छा व निरिच्छा यांचा प्रश्नच येत नाही. आता आपल्याला हे ज्ञान आहे की इच्छा काय असते व निरिच्छा काय असते. हे ज्ञान असतांना 'इच्छा मात्रम् अविद्या' बनणे यालाच ब्राह्मण जीवन म्हटले आहे. जेव्हा रचयिता आपला झाला तेव्हा रचना कुठे जाईल? जेथे शिवबाबा आहे तेथे सर्व काही आहे. याचेच गायन आहे, 'बाबा मिला सब कुछ मिला' **संगमयुगात आपल्याला इतकी प्राप्ती झाली आहे की आपल्या सर्व इच्छा जरी एकत्रित केल्या तरी त्यांच्या पद्मपटीने प्राप्ती झाली आहे. तात्पर्य म्हणजे संगमयुगात जी अगणित प्राप्ती झाली आहे, तिच्यापुढे इच्छा काय आहे? जसा सूर्यासमोर दीपक.**

त्यामुळे सदा सर्व प्राप्ती संपन्न स्थितीचा अनुभव करून संतुष्ट वा प्रसन्न राहू या. कुठली इच्छा मनात उत्पन्न होणे तर सोडाच परंतु इच्छा काय असते, हा प्रश्नही मनात उठता कामा नये. अशा प्रकारे ब्राह्मण जीवनात इच्छा समाप्त झाली पाहिजे. या उलट जरा सुद्धा इच्छेचा अंश शिल्लक राहिला तर त्यापासून वंश निर्माण होऊ शकतो. (याचेच प्रतीक म्हणून रावणाला आधी मारले जाते,



**संपन्न बनण्याचा आधार – आपली विशेषता ईश्वरी सेवेत लावा, प्रत्येक ब्राह्मण आत्म्यामध्ये कुठली ना कुठली विशेषता जरुर आहे. तिला ओळखा व तिला ईश्वरी कार्याला लावा.**

**सदा प्रसन्न रहाण्यासाठी स्वतः स्वमानात राहा व दुसऱ्यांनाही सन्मान द्या. आपल्या संबंध संपर्कात येणारा प्रत्येक आत्मा, परमात्मा शिव पित्याची श्रेष्ठतम रचना आहे. परमात्मा पित्याला अति प्रिय आहे. त्यामुळे प्रत्येक आत्म्यावर बिनशर्त प्रेम करा.**

मग जाळले जाते.) कित्येक जण असे म्हणतात की आम्हाला इच्छा तर नाही. परंतु एखादी गोष्ट, एखादी व्यक्ती (गुण वा विशेषतांच्या आधारे) चांगली वाटते. परंतु अशाप्रकारे चांगले वाटणे हे सुद्धा इच्छेचेच सूक्ष्म रूप आहे. यातूनच पुढे अनेक इच्छा उत्पन्न होतात. परिणामतः पुढे सारे रामायण घडते. त्यामुळे आपल्याला एक शिवबाबाच चांगले वाटले पाहिजेत तरच आपण सदा संतुष्ट वा प्रसन्न राहू शकू.

**प्रसन्नतेची पावन गंगा बनण्यासाठी स्मृतिस्वरूप बना –**

ज्ञानसागर शिवबाबांनी आपल्याला जे अनेकानेक स्वमान, ईश्वरीय नशा, तसेच दिव्य स्मृतींचे वरदान दिले आहे. ते जेव्हा आपल्या प्रॅक्टीकल जीवनात अर्थात संकल्प, बोल व कर्माद्वारे प्रत्यक्ष होत जातील तेव्हा आपण सदा प्रसन्नतेचा अनुभव करू शकू. शिवबाबांनी आपल्याला होलीएस्ट, हायेस्ट व रिचेस्ट बनविले आहे. परंतु ही स्मृती वा नशा सदा इमर्ज (प्रकट रूपात) असला पाहिजे. तरच आपण प्रसन्नतेची पावन गंगा बनू. **शिवबाबांनी आपल्याला सर्व गुण, सर्व शक्ती व संपूर्ण ज्ञान दिले आहे. त्यांनी आपल्याला मास्टर गुणसागर, मास्टर सर्वशक्तिवान, मास्टर ज्ञानसागर बनविले आहे. ही स्मृतिस्वरूप अवस्था आपल्याला सहजच प्रसन्नतेची पावन गंगा बनवील.**

**सदा प्रसन्न राहण्यासाठी स्वमान व निर्मान यांचा समतोल आवश्यक –**

कित्येक ब्रह्मावत्स सेवाकेंद्रातील योगयुक्त वातावरणाच्या संपर्कात सतत राहून सर्व प्राप्तींच्या स्मृतिस्वरूप बनतात. त्यांचा हा स्वमान पक्का होतो की मी महारथी आहे, ज्ञानी आहे, योगी आहे, मी मुरली चांगली वाचतो, उत्तमप्रकारे ज्ञानदान करतो, भाषण करतो, परंतु या स्वमानाबरोबर निर्मान भाव, निमित्त भाव, निर्मल वाणी, दुसऱ्यांना सन्मान द्यायची वृत्ती हवी. ती जर नसेल तर स्वमान हा देहअभिमानात परिवर्तन होतो. ती एक सोन्याची बेडी बनते.

तात्पर्य म्हणजे स्वमान व निर्मान यांचा बॅलन्स (समतोल) असेल तरच आपण प्रसन्न राहू शकतो. आपल्याला शिवबाबांनी ज्या प्राप्ती करवल्या आहेत, त्या दुसऱ्यांना देण्यासाठी **आपण स्वतः स्वमानात राहून जर दुसऱ्याला कमी, हीन–दीन समजले तर स्वतःच्या हाताने आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे. त्यामुळे सदा प्रसन्न रहाण्यासाठी स्वतः स्वमानात राहा व दुसऱ्यांनाही सन्मान द्या.** आपल्या संबंध संपर्कात येणारा प्रत्येक आत्मा, परमात्मा शिव पित्याची श्रेष्ठतम रचना आहे. परमात्मा पित्याला अति प्रिय आहे. त्यामुळे प्रत्येक आत्म्यावर बिनशर्त प्रेम (Unconditional Love) करा. सर्व आत्म्यांना आपला भाऊ समजून, त्यांचा सन्मान करा. त्यांच्या वर्तमान तमोगुणी स्वभावाला न बघता त्यांच्या, अनादि व आदि पवित्र सत्वगुणी स्वरूपाला पाहा.

पिताश्री ब्रह्माबाबांच्या प्रत्येक कर्मातून स्वमान व निर्मान यांचा समतोल दिसून येत असे. पिताश्री ब्रह्माबाबा मुरली संपल्यानंतर जेव्हा क्लासच्या बाहेर जात असतं तेव्हा ब्रह्मावत्सांना वाकून नमस्कार करीत असत. मुलांकडे पाठ करून जात नसत. केवढा मोठा निरहंकारीपणा यातून स्पष्ट होतो. २) पिताश्री ब्रह्माबाबा कुठल्याही यज्ञवत्साची चूक झाल्यावर त्याच्यावर रागवत नसत. परंतु तशा प्रकारची चूक दुसऱ्यांकडून पुन्हा होऊ नये, म्हणून मुरलीतून केवळ इशारा देत असत. ३) पिताश्री ब्रह्माबाबा यज्ञसेवेचे कुठलेही काम मोठ्या आवडीने व उत्साहाने करीत. उदा. धान्य साफ करणे, रस्ता वगैरे तयार करतांना मुलांबरोबर सहयोग देणे, हॉलची साफसफाई करणे इत्यादी ४) ब्रह्माबाबा मुलांना इतका सन्मान देत की ते स्वतः झोपडीत राहत. परंतु मुलांना मात्र नवीन इमारतीत राहायला सांगत ५) पिताश्री स्वतःला शिवबाबांची 'पुरानी जुती व लॉंग बूट' असेही संबोधन करीत. ६) पिताश्री यज्ञवत्सांना आपल्याबरोबर ब्रह्माभोजनासाठी बोलवून, त्यांना प्रेमाने भरवीत असत. आपण प्रत्येकाने देखील याबाबतीत पिताश्री ब्रह्माबाबांचे अनुकरण करूया.

**आपली प्रसन्न स्थिती दुसऱ्यांनाही प्रसन्नता प्रदान करते.**

ज्याप्रमाणे अल्पकाळाच्या प्राप्तीमुळे होणारी अल्प काळाची

प्रसन्नता ही चेहऱ्यावर दिसून येते त्याप्रमाणे संगमयुगात परमात्मा पित्याकडून आपल्याला होणाऱ्या सर्व प्राप्तींमुळे होणारी प्रसन्नता देखील चेहऱ्यावर दिसून येते. ही प्रसन्नता ब्राह्मण जीवनाची निशाणी आहे. प्रत्यक्ष प्रमाण आहे. अल्पकाळाची प्रसन्नता व सदाकाळची प्रसन्नता यात जमीन-आस्मनाचे अंतर आहे. आत्मिक प्रसन्नता ही जशी स्वतः ला प्रसन्नतेचा अनुभव करवते तशी तिची वायब्रेशन्स (प्रकंपने) अन्य आत्म्यापर्यंत देखील पसरतात. त्यामुळे अन्य आत्मे शांती व शक्तीची अनुभूती करतात. ज्याप्रमाणे एखाद्या फलदायी वृक्षाच्या शीतल छायेखाली बसल्यानंतर, मनुष्याला शीतलतेचा अनुभव होतो व तो प्रसन्न होतो. त्याप्रमाणे परमात्म प्राप्तींनी संपन्न आत्मिक प्रसन्न आत्मा, दुसऱ्यांनाही आपल्या प्राप्तीची अंचली देऊन, शांती व शक्तीचा अनुभव करवतो.

ब्रह्मावत्सांमध्ये देखील काहीजण सदा प्रसन्न राहतात तर काहीजण कधी-कधी प्रसन्न राहतात. कधी-कधी प्रसन्न राहण्याचे कारण म्हणजे त्यांना संगमयुगातील परमात्म प्राप्तींची कधी कधी विस्मृती होते. ज्ञानमार्गातील पहिला पाठ 'मी कोण' याचाच त्यांना विसर पडतो. परिणामतः तेवढ्या वेळाकरिता त्यांची प्रसन्नता गायब होते. त्यावेळी ते स्वतःला साधारण समजतात. मी 'शिवशक्तीस्वरूप' आहे, ही गोष्ट ते विसरतात. पुन्हा थोड्या वेळानंतर त्यांना आपली यथार्थ स्मृती होते. अशाप्रकारे त्यांच्या जीवनात स्मृती-विस्मृतीचा खेळ चालू असल्याने, ते सदा प्रसन्न राहू शकत नाहीत. जोपर्यंत ते स्वतःला देह समजून, देहाचे संबंधी व देहाच्या दुनियेचे चिंतन करत असतात तोपर्यंत ते प्रसन्नतेचा अनुभव करू शकत नाहीत. परंतु जे ब्रह्मावत्स परमात्म प्राप्तींच्या स्मृतिस्वरूप आहेत, ते मात्र सदा स्वतःही प्रसन्न राहतात तसेच दुसऱ्यांशी प्रसन्नतापूर्वक व्यवहार करतात. त्याचबरोबर आपल्याला जी सेवा मिळाली आहे, त्या सेवेद्वारेही प्रसन्न राहतात. अशा ब्रह्मावत्सांवर स्वयं परमात्माही प्रसन्न असल्याने, ते सदा सफलतामूर्त बनतात. म्हणूनच गायन केले जाते - 'मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण'



**प्रसन्न राहण्यात बाधक गोष्टी कोणत्या?**

**प्रसन्न राहण्यात प्रामुख्याने दोन गोष्टी बाधक आहेत - (१) स्वतःला कमी लेखणे. माझे भाग्यच असे नाही. माझा ड्रामामध्ये पार्टच असा आहे, असा विचार करणे. (२) दुसऱ्यांच्या विशेषता, त्यांचे भाग्य वा विशेष पार्ट पाहून, त्यांची ईर्ष्या करणे, या दोन गोष्टी 'जर' असतील 'तर' ती व्यक्ती कधीच प्रसन्न राहू शकत नाही.**

आपण जेव्हा हे विसरून जातो की शिवबाबांनी आपल्या सर्व मुलांना सारखेच खजिने दिले आहेत. अशी कुठलीच गोष्ट नाही, जी शिवबाबांनी कुठल्या मुलाला दिली नाही. प्रत्येकाला सर्व खजिने दिले आहेत परंतु त्याचा वापर करण्याची विधी कोणाकोणाला येत नाही.

जसे एखाद्याकडे स्थूल धन असते. परंतु त्याला त्याचा सदुपयोग करता येत नाही. तसेच काहींना प्राप्त खजिन्यांचा प्रयोग वेळेवर करता येत नाही. वेळ निघून गेल्यावर ते असा विचार करतात की असे करायला पाहिजे होते, असे करायला नको होते. परिणामतः योग्य वेळी प्राप्त खजिने वापरले न गेल्याने सफलता प्राप्त होत नाही. कारण समयरूपी गाडी निघून गेलेली असते. त्यामुळे आपल्याला प्राप्त ईश्वरी खजिन्यांचा (ज्ञान, गुण व शक्तीचा) वेळेवर वापर केला पाहिजे तरच आपल्याला सदा सफलता प्राप्त होईल व आपण सदा प्रसन्न राहू.

दुसरी गोष्ट म्हणजे दुसऱ्याच्या पार्टची ईर्ष्या करणे, हे देखील चुकीचे आहे. कारण या सृष्टिनाटकातील प्रत्येक आत्म्याचा पार्ट (भूमिका) हा अनादि, अविनाशी व एकमेव स्वरूपाचा आहे. मुख्य म्हणजे हे नाटक पूर्वनियोजित व अपरिवर्तनशील आहे. **त्यामुळे दुसऱ्याच्या पार्टची ईर्ष्या करण्यात काहीच अर्थ नाही. फक्त आपल्याला जो पार्ट मिळाला आहे तो मोठ्या आनंदाने व कुशलतापूर्वक बजावणे, एवढेच आपल्या हातात आहे. असे केल्यानेच आपली प्रसन्नता कायम राहील.**

# क्रोधावर विजय कसा प्राप्त कराल?

- **ब्र.कु. भगवानभाई**, शांतिवन (आबू रोड)

क्रोधाची ज्वाला अतिभयंकर महाविनाशकारी आहे. मनुष्य जेव्हा क्रोधायमान होतो तेव्हा त्याची विचारशक्ती नाहीशी होते. त्यामुळे फार भयंकर परिणाम घडून येतात. क्षणार्धात घरेच्या घरे जळून खाक होतात आणि देश ओस पडतात. क्रोध माणसांना अनेक रूपांनी सतावीत असतो. उद्वेग, द्वेष, ईर्ष्या, वैरभाव, सूडबुद्धी, हिंसा इत्यादी भिन्न-भिन्न रूपे क्रोधाचीच आहेत. क्रोध हे असे भूत आहे जे कुठेही प्रत्यक्ष होते. लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, विद्वानापासून महान तपस्वी पर्यंत सर्वांना ते परास्त करू शकते. दुर्वासा, विश्वामित्र, परशुराम इत्यादींना क्रोधानेच हरवलं. एवढंच नव्हे तर जनावर, पशु-पक्षी यांच्यात सुद्धा क्रोध विद्यमान आहे. हा सर्वनाशी शत्रू आहे. साऱ्या जगाला नर्क वा दुःखधाम बनविणाऱ्या या शत्रूपासून चार हात दूरच रहायला हवे. ज्या घरात क्रोधाचे वास्तव्य असते, त्या घरातील पाण्याचे घडेही सुकून जातात. पाणीच काय परंतु क्रोधी माणसाचे रक्तही आटते. म्हणूनच क्रोधावर मात करण्यासाठी प्रत्येकाने पुरुषार्थ करण्याची आवश्यकता आहे. त्याविषयी आपण थोडक्यात पाहूया.

**क्रोधाचे प्रवेशद्वार आहे अहंकार-**

साधारणतः प्रत्येक व्यक्ती चांगला व्यवहार करू इच्छिते. परंतु जेव्हा कोणी त्याची निंदा वा तिरस्कार करतो तेव्हा त्याचा अहंकार जागृत होतो व तो स्वतः ला चांगला, स्वच्छ, इमानदार असल्याचे सिद्ध करण्याची जिद्द करतो. अशावेळी त्याच्यात क्रोधाची प्रवेशता होते. याला जेव्हा समोरची व्यक्ती विरोध करते तेव्हा आणखीनच क्रोधाग्नि विक्राळ रूपात प्रगट होतो. ज्याच्यात जितका अधिक प्रमाणात मीपणा, अभिमान असेल; त्याला तितका शीघ्रतेने क्रोध येतो, तसे पाहिले तर क्रोध सर्वव्याप्त आहे. **परंतु त्याच्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी, मी आत्मा निराकारी व निरहंकारी आहे, ही स्मृती ठेवल्यास क्रोधाचे प्रवेशद्वार बंद करता येऊ शकते. त्यासाठी आता साकार देहाचे भान विसरून आत्मचिंतन करा. स्वतःला निश्चिंत व निर्मान समजून कार्यव्यवहार करा. कर्ताकरविता शिवबाबा आहे, ही स्मृती ठेवा.** तसेच सरळचित्त व सकारात्मक दृष्टी ठेवा म्हणजे क्रोध आपल्याला स्पर्श देखील करू शकणार नाही.

**क्रोधाचा प्रहार व क्रोधाची हार-**

क्रोधाचे मनात आक्रमण होताच, तो मनुष्याला विवेकशून्य बनवून, कर्मेंद्रियांना क्षणिक सुख देतो. नंतर लगेचच क्रोधी व्यक्तीला निर्बल व असहाय्य बनवून परास्त करतो. कित्येकांचा असा समज आहे की क्रोध केल्याने कार्य सहज होते. तसे जरी झाले तरी क्रोधी व्यक्तीमध्ये असहिष्णुता, निराशा व चिंता स्पष्ट दिसून येते. याच ज्वलंत उदाहरण म्हणजे दुसऱ्या महायुद्धात वैज्ञानिकांनी क्रोधवश होऊन, हिरोशिमा व नागासाकी वर ॲटम बॉम्ब टाकले. परंतु या घटनेला ते सहन करू शकले नाहीत. परिणामतः त्यांनी जीवघात (आत्महत्या) केला. अशा प्रकारे क्रोधी व्यक्तिंची सदैव हार होते. **त्यामुळे क्रोधापासून सावध रहा. आपल्या मनात जरी क्रोधाचा संकल्प आला तरी वाणी आणि कर्मात येऊ देऊ नका. सदैव शांती स्वधर्मात राहा म्हणजे क्रोधाला जिंकू शकाल.**

**क्रोध करण्यात वीरता नसून निर्बलता आहे -**

आपण सर्वजण हे जाणतो की क्रोधामुळे मनुष्याचे जीवन बरबाद होते. क्रोध मनुष्याला सैतान बनवतो व अविवेकाच्या आहारी जाऊन हिंसाचार व पापाचाराला बळी पडतो. शेवटी कारागृहात जाऊन खडी

**क्रोध माणसांना अनेक रूपांनी सतावीत असतो. उद्वेग, द्वेष, ईर्ष्या, वैरभाव, सूडबुद्धी, हिंसा इत्यादी भिन्न-भिन्न रूपे क्रोधाचीच आहेत. क्रोध हे असे भूत आहे जे कुठेही प्रत्यक्ष होते. लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, विद्वानापासून महान तपस्वी पर्यंत सर्वांना ते परास्त करू शकते. दुर्वास, विश्वमित्र, परशुराम इत्यादींना क्रोधानेच हरवलं.**

फोडायची पाळी येते. कित्येकांना तर जन्मठेपेची शिक्षा झाल्याने, आयुष्यभर पश्चात्ताप करावा लागतो. अगदी थोड्या वेळाकरिता त्यांच्यात क्रोधाचे भूत शिरल्याने संपूर्ण जीवन नर्कमय बनून जाते.

जे वारंवार क्रोध करतात त्यांच्या जीवनात अनेक संकटे येतात. त्यांना शारीरिक स्वास्थ्य लाभत नाही. त्यांना जीवनात दुःख भोगावे लागते. यावरून आपल्या लक्षात येईल की क्रोध करणे ही वीरता नसून, निर्बलता अथवा बुद्धिहीनतेचे लक्षण आहे. **त्यामुळे आता क्रोधाला जिंकून आपली वीरता प्रत्यक्ष करा. सर्वांशी शांती व सद्भावना पूर्ण व्यवहार करा. आपण सर्वजण एक पिता परमात्म्याची मुले, आपापसात भाऊ-भाऊ आहोत ही भावना दृढ करा. म्हणजे सदैव प्रेमाची गंगा वहात राहील व त्यात आपोआपच मनातील क्रोधाची मलिनता वाहून जाईल.**

**शांती व विनम्रतेच्या आधारे क्रोधाला जिंका-**

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात उतार-चढाव तर येतातच. ज्यामध्ये व्यक्तीला वैरविरोध, अपमान, निंदा तसेच प्राकृतिक आपत्तींचा सामना हा करावा लागतोच अशा वेळी उद्विग्न वा निराश न होता, आपली मनस्थिती शांत व विनम्र ठेऊन कार्य केले पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत क्रोध येता कामा नये. त्यासाठी सर्वप्रथम मनाशी हे पक्के करा की, ''काहीही झाले तरी मी क्रोध करणार नाही. सदैव शांत चित्त राहीन. तरीसुद्धा मला कोणी त्रास देत असेल तर मी क्षमाशील बनून, शुभविचारांची वायब्रेशन्स पसरवीन'' अशाप्रकारे या

> **''मीठे बच्चे, कोई तुम्हारे पर क्रोध करता है तो भी तुमको क्रोध नही आना चाहिए, उसको सुना-अनसुना कर देना चाहिए । भूल समझकर उसका सामना नही करना चाहिए । किनारा करना चाहिए । उसका काम है क्रोध करना और आपका काम है स्नेह देना । इसलिए चाहे सारी दुनिया क्यों नही आपपर क्रोध करे लेकिन आप मास्टर स्नेह के सागर, दुनिया की परवाह नही करेंगे ।''**

सृष्टिनाटकातील प्रत्येक दृश्य साक्षी द्रष्टा बनून पाहिल्यास, आपण सदैव निर्विघ्न राहू शकतो व क्रोधावर मात करू शकतो. जसे काट्यांच्या मध्ये राहूनही गुलाब पुष्प सर्वांना सुगंध देतो. तसेच क्रोधी व्यक्तीच्या संबंध-संपर्कात राहूनही आपण मधुरता, स्नेह, सहनशीलता, सरलता या दिव्य गुणांचा सुगंध पसरवू शकतो. **या अनुषंगाने स्नेह सागर शिवबाबांची पुढील महाकाव्ये अतिशय बोधप्रद आहेत - ''मीठे बच्चे, कोई तुम्हारे पर क्रोध करता है तो भी तुमको क्रोध नही आना चाहिए, उसको सुना-अनसुना कर देना चाहिए । भूल समझकर उसका सामना नही करना चाहिए । किनारा करना चाहिए । उसका काम है क्रोध करना और आपका काम है स्नेह देना । इसलिए चाहे सारी दुनिया क्यों नही आपपर क्रोध करे लेकिन आप मास्टर स्नेह के सागर, दुनिया की परवाह नही करेंगे ।''**

**क्रोध हा माणसांचा महाशत्रू आहे**

क्रोध हा माणसाचा शत्रू नसून, महाशत्रू आहे. त्यामुळे त्यास नष्ट करण्याची प्रत्येकाची आंतरिक इच्छा असणे आवश्यक आहे. क्रोध हा माणसाचा मूळ स्वभाव नाही. वस्तुतः प्रत्येक आत्म्याचा स्वधर्म शांती आहे. त्यामुळे हेच चिंतन करा की मला सदैव शांती स्वधर्मातच स्थित रहायचे आहे. असे चिंतन केल्याने आपल्यात सहनशीलता, क्षमाभाव, दयाभाव, आत्मिक स्नेह, परोपकाराची भावना अशा अनेक दिव्यगुणांची अभिवृद्धी होत जाते. याउलट क्रोधाने आपल्यातील सर्व दिव्य गुणांचा ऱ्हास होत जातो. तात्पर्य म्हणजे क्रोधाग्नीमुळे दिव्य गुणांनी बहरलेली जीवनरूपी फुलबाग जळून खाक होते. त्यामुळे क्रोधरूपी महाशत्रूला समूळ नष्ट करा. दसऱ्याला आपण रावणाला जाळतो, परंतु रावण हे काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार या पाच विकारांचे प्रतीक आहे, हे जाणत नसल्याने आपल्यातील मनोविकार मात्र न जळता तसेच शिल्लक राहतात. आता यावर्षी मात्र खऱ्या रावणाला अर्थात आपल्यातील कामक्रोधादि पाच विकारांना जाळा. म्हणजे आपल्या जीवनात अविनाशी सुख, शांती, प्रेम, आनंद... या सर्व गोष्टी अनुभवाला येतील. समर्थ रामदासांनी देखील अतिशय सुंदर व सोप्या शब्दात मनाला समजावून सांगितले आहे-

**नको रे मना क्रोध हा खेदकारी ।**
**नको रे मना काम नानाविकारी ।**
**नको रे मना लोभ हा अंगिकारु ।**
**नको रे मना मत्सरु दंभभारु ।।**

▶ पान नं. २८ वर



**गडचिरोली :** येथील मुक बधीर विद्यालयातील विद्यार्थ्यांना राखी बांधल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. नलिनी बहेन



**जालना :** येथील कारागृहात कैदी बांधवांसाठी आयोजित कार्यक्रमात उपस्थित मान्यवर जेल अधीक्षक श्री. कोहाळे, डॉ. मोरे, श्री. सुरज चौधरी, ब्र. कु. सुलभा बहेन व अन्य



**वाशी (नवी मुंबई) :** वृक्षारोपण कार्यक्रमात वृक्षारोपण करताना महापौर श्री. सुधाकर सोनवणे, ब्र. कु. शीला दीदी व सभापती श्री. प्रकाश मोरे



**भिलवडी (सांगली) :** 'डॉक्टर्स डे निमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना डॉ. राजेंद्र, डॉ. भालचंद्र, डॉ. जयकुमार, ब्र. कु. मीरा बहेन, सरपंच धनंजय पाटील व अन्य



**शिरूर :** नगरपालिका सभागृह नेते श्री. धडिवाल, नगराध्यक्षा वैशालीताई वाघमारे व माजी आमदार श्री. गावडे यांना रक्षासूत्र बांधताना ब्र. कु. अर्चना, सुप्रिया व वेदिका बहेन



**अमरावती :** पोलिस कमिशनर श्री. दत्तात्रय मांडलिक यांना राखी बांधताना ब्र. कु. सीता बहेन, सोबत ब्र. कु. जया बहेन



**गुहागर :** सी.आय.एस.एफ. च्या अधिकाऱ्यांना राखी बांधताना ब्र. कु. शिल्पा बहेन



**श्रीरामपूर :** नगराध्यक्षा अनुराधा ताई आदिक यांना राखी बांधताना ब्र. कु. मंदा बहेन




**बार्शी (सोलापूर) :** असि.पो. कमिशनर शर्मिला यागरे, ॲड. विजय मराठे व अन्य मान्यवरांना राखी बांधल्यानंतर भेटवस्तू देतांना राजयोगिनी सोमप्रभा दीदी.



**अकोला (किर्तीनगर):** पो. निरीक्षक श्री. शेळके व पोलिस स्टाफ यांना राखी बांधल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. अर्चना बहेन



**बांबवडे :** हायस्कूल टीचर भगिनींना ईश्वरी संदेश दिल्यानंतर राखी बांधताना ब्र. कु. संगीता बहेन व रूपा बहेन



**भूम (उस्मानाबाद) :** पो. निरीक्षक श्री. सुर्यवंशी व पोलिस स्टाफ यांना राखी बांधल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. राधा बहेन व शिवाली बहेन



**अहमदनगर :** खासदार श्री. दिलीप गांधी यांना राखी बांधताना ब्र. कु. उज्ज्वला व वर्षा बहेन



**पाचोरा :** आमदार भ्राता किशोर आप्पा यांना ईश्वरीय संदेश दिल्यानंतर, सौगात देताना ब्र. कु. नंदा बहेन, ब्र. कु. दत्तुभाई व विलास भाई (शांतिवन)



**देऊळगाव राजा :** आमदार श्री. शशिकांत खेडेकर यांना ईश्वरीय भेटवस्तू देताना ब्र. कु. सुनंदा बहेन, शेजारी माजी नगराध्यक्ष गोविंद मोरे व भ्राता मोरेश्वर



**गडचिरोली :** जिल्हा काँग्रेस अध्यक्ष भ्राता नामदेव उसेंडी यांना राखी बांधताना ब्र. कु. नलिनी बहेन



**कासेगाव (सांगली) :** सेवाकेंद्रावर आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना आमदार श्री. जयंतराव पाटील, ब्र. कु. सुनिता व पद्मा बहेन, श्री. अनिल माने व श्री. जनार्दन पाटील



**नेसरी (कोल्हापूर):** 'बँक ऑफ इंडिया' चे मॅनेजर श्री. दत्तात्रय आवटे यांना राखी बांधताना ब्र. कु. माधुरी व निवेदिता बहेन



**संगमनेर :** सेवाकेंद्रावर रक्षाबंधन कार्यक्रमात उपस्थित लायन्स क्लबचे डि. गव्हर्नर श्री. गिरीश मालपाणी, व्यापारी श्री. भंडारी व अन्य मान्यवरांसोबत ब्र. कु. भारती, पद्मा व योगिनी बहेन



**वाघोली (पूणे) :** येथील शालेतील रक्षाबंधन कार्यक्रमानंतर ग्रुप फोटोत प्राचार्य व शालेय शिक्षकांसमवेत ब्र. कु. अनिता बहेन




**चोरढे (रायगड) :** शाळेतील रक्षाबंधन कार्यक्रमानंतर ब्र. कु. पुनम बहेन यांचे अभिनंदन करताना मुख्याध्यापक श्री. पाटील



**रोहा :** येथील ज्ञानगंगा बहुविकलांग शाळेय रक्षाबंधन कार्यक्रमानंतर ग्रुप फोटोत शालेय विद्यार्थी, पालक वर्ग, टीचर तसेच ब्र. कु. पूनम व परमजीत बहेन



**माळशिरस (सोलापूर) :** पी.एस.आय. शेडगे मॅडम व पोलिस स्टाफ यांना राखी बांधल्यांनतर ग्रुप फोटोत ब्र. कु. जयश्री बहेन



**पाचोरा :** नगरसेवक भ्राता प्रदीपभाई (बापू) यांना रक्षासूत्र बांधताना ब्र. कु. नंदा बहेन



# खुशीचे निर्माता आपण स्वतःच आहोत..

– **ब्र.कु. शिवानी बहेन**, गुडगाव.

या जगातील प्रत्येक जण खुशी किंवा आनंद प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करत असतो. वास्तविक पाहता खुशी ही आपलीच रचना आहे. मग प्रश्न असा उपस्थित होतो; की जर ही आपलीच रचना आहे तर मग खुशीसाठी आपल्याला आवश्यकतेपेक्षा अधिक प्रयत्न का करावा लागतो? आपल्याला ती सहज प्राप्त का होत नाही? कोणत्या चुकीच्या मान्यतांमुळे आपण जीवनात निरंतर खुशीचा अनुभव करु शकत नाही? या सर्व गोष्टी आपण सार रूपाने पाहूया.

**खुशी भविष्यात न शोधता ती वर्तमानात अनुभवा–**

सर्वप्रथम आपण एक चुकीची मान्यता वा विश्वास मनामध्ये निर्माण केला आहे की अमुक एक गोष्ट मी भविष्यात केली तर मला खुशी मिळेल. आज आपण आपल्या विद्यार्थीदशेकडे जर वळून पाहिले तर आपण म्हणतो की विद्यार्थी जीवन हेच सर्वश्रेष्ठ जीवन होते. परंतु जेव्हा आपण विद्यार्थीदशेत असतो तेव्हा मात्र म्हणतो की जेव्हा माझे शालेय शिक्षण पूर्ण होईल, कॉलेज शिक्षण पूर्ण होईल आणि मला चांगली नोकरी लागेल तेव्हा मी खुश होईल. याचा अर्थ विद्यार्थी दशेत मी खुश नव्हतो. आता तर आपलं शिक्षण पूर्ण झालं. चांगली नोकरी देखील लागली. तेव्हा आपण विचार करू लागतो की जेव्हा माझे दोनाचे चार हात होतील अर्थात चांगला जीवनसाथी मिळेल तेव्हा मी खुश होईल. चला आपल लग्न झालं मग आपण विचार करतो की प्रपंच वाढला, मुलंबाळं झाली, स्वतःचा बंगला, कार खरेदी केली की मग खुश होऊ. याचाच अर्थ आपण प्रत्येक वेळी आपली खुशी भविष्यात शोधत राहिलो. अशा प्रकारे प्रत्येक वेळी खुशी स्थगित होत गेली व भविष्यात खुशी शोधण्याच्या प्रक्रियेत आपले जीवन व्यतीत होत गेले. तात्पर्य म्हणजे आजवर आपण खुशीच्या प्राप्तीसाठी जे प्रयत्न केले; ते इतर लोकांच्या वर्तणुकीवर किंवा आपण कमावलेल्या भौतिक साधनांवर अवलंबून होते. अशा प्रकारे आपली खुशी ही जोपर्यंत दुसऱ्या कोणावर तरी अवलंबून आहे तोपर्यंत आपल्याला खुशी मिळू शकणार नाही. यावरून आपल्या लक्षात आले असेल की, खुशी भविष्यात न शोधता ती वर्तमान जीवनात अनुभवली पाहिजे.

**आपली खुशी कुणा व्यक्तीवर, परिस्थितीवर वा वस्तूवर अवलंबून नसावी.**

जर आपली खुशी एखाद्या व्यक्तीवर अवलंबून असेल तर आपल्या मनात सदैव हा विचार असतो की, ही व्यक्ती आपल्यावर नाराज तर होणार नाही ना? खुश तर होईल ना? अशा वेळेस एक प्रकारची असुरक्षितता अथवा भय अनुभवाला येते. जेथे भय आहे तेथे खुशी कशी प्राप्त होईल? कित्येक जणांचा संपूर्ण दिवस कधी परिस्थितीवर, कधी इतरांवर, कधी वस्तूवर, न जाणो आणखी कोणत्या गोष्टीवर अवलंबून असतो. जर आपण इतक्या गोष्टींवर अवलंबून असू तर मग खुशीचे काय? तात्पर्य म्हणजे आपली खुशी कुठल्याही गोष्टींवर अवलंबून नसावी. आपल्याला सदैव ही जाणीव असली पाहिजे की, ''मी खुशी निर्माण करू शकतो. मला खुश होण्यासाठी इतरांना खुश करण्याची आवश्यकता नाही. मी स्वतः आतून खुशी, प्रेम आणि शांती यांनी परिपूर्ण आहे''. अशा प्रकारची चांगली सकारात्मक ऊर्जा जेव्हा आपल्या मनात निर्माण होईल तेव्हा आपल्या मनात भीती किंवा असुरक्षिततेची भावना राहणार नाही.

जेव्हा आपली मनस्थिती शांत वा स्थिर असते तेव्हा आपली खुशी आपल्या हातात असते, कारण शांती, प्रेम, खुशी हे जे आपले मूळ स्वभाव आहेत, ते आपोआपच प्रवाहित होतात; त्यांची आपल्याला जाणीवर्पूक निर्मिती करावी लागत नाही. यासाठी आपल्याला आणखी काही वेगळे करण्याची आवश्यकता पडत नाही.

**आपली खुशी सारखी कमी अधिक का होते?**

आपली खुशी सारखी कमी अधिक होण्याचे मुख्य कारण म्हणजे आपण आपल्या संबंधांमध्ये कोठे ना कोठे अधिक अवलंबून रहातो आणि दुसरी गोष्ट म्हणजे जेव्हा आपण आपल्याजवळच्या लोकांना त्रास होताना पाहतो तेव्हा आपण

▶ पान नं. ३० वर



भाग-२

# मनुष्यसृष्टीला प्रदूषित करणाऱ्या देहाभिमानाचा व मनोविकारांचा त्याग हा त्याग नव्हे!

– **ब्रह्माकुमार जगदीश दीक्षित**, पुणे

अशी ही महान व कल्पनातील क्रांती लक्षावधी राजयोगी क्रांतीवीरांच्या द्वारे घडवून आणणे ही तर परमात्म्याची सर्वोत्कृष्ट व विश्वकल्याणी राजनीति आहे. वर्तमान सयमीच्या निरस, भ्रष्ट, अशाश्वत व जीवघेण्या सिद्धांतहीन राजनीतित व्यर्थ वेळ घालविण्यापेक्षा तुम्ही परमात्म्याच्या ह्या सिद्धांतयुक्त राजनीतिला सहयोग 'द्याल' तर भविष्यात निर्विघ्न, निर्विरोध व शाश्वत असे सुखदायी रामराज्य तुम्हास प्राप्त होईल. सत्ययुग, त्रेतायुगातील २५०० वर्षे दैवी स्वराज्य उपभोगल्यानंतर दैवी मनुष्य आत्म्यातही देहाभिमान निर्माण होवू लागतो. फलस्वरूप रावण (५ मनोविकार) पुनः जीवित होतो. हा दृष्ट रावण आपल्या दुष्क्रांती द्वारे आपले राज्य मानवी मनात पुनश्च निर्माण करतो. बंधुनो, अर्धा कल्प (२५०० वर्षे) रामराज्य तर अर्ध्या कल्पासाठी रावणराज्य निर्माण होणे ह्या कल्प-कल्प घडणाऱ्या दोन प्रक्रियांच्या कारणे हे सृष्टीचक्र सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग व कलियुगातून अविरत भ्रमण करीत आहे. अर्थात हे चक्र अनादि अनंत काळाचे आहे.

केवळ कलियुगाच्या अंतिम चरणातच निराकार परमात्मा अवतरित होवून, मनोविकारांच्यावर विजय प्राप्त करण्यासाठी राजयोगासहित मूळ गीताज्ञान प्रदान करीत आहे. सदरहू गीताज्ञान बहुतांश मनुष्यात्म्यांना कटु वाटते, तर अत्यल्प प्रभूप्रेमी मनुष्यात्मे, परमात्म ज्ञानाला अमृत मानून त्याचा अंतःकरणापासून स्वीकार करतात. त्यांच्या बुद्धीचा निर्णय हाच होतो की शिव परमात्मा सर्वाधिक कल्याणकारी असल्याने, आत्म्याचे अकल्याण होईल असे तो अंशमात्रही काही सांगणार नाही. उद्धारकर्त्या परमात्म्याद्वारे उद्धार होण्यातच आत्म्याचे सर्वोत्तम कल्याण आहे. बंधुनो, सत्ययुगाशिवाय अन्य युगे निर्माण करण्यासाठी परमात्म्याची आवश्यकता नसते. कारण ही युगे मनुष्यात्म्यांच्या पतनाद्वारे सहज निर्माण होतात. परंतु सर्वाधिक पतित झालेल्या तमोप्रधान कलियुगातून सत्वप्रधान सत्ययुग निर्माण करण्यासाठी, उद्धारकर्त्या परमात्म्याची आवश्यकता असते. अर्थात अन्य कोणत्याच युगांत परमात्मा अवतरित होत नाही. सत्ययुगातून त्रेतायुगात, त्रेतायुगातून द्वापरयुगात व द्वापरयुगातून कलियुगात जन्म प्राप्त करण्यासाठी मनुष्यात्माला कोणताही पुरुषार्थ करण्याची आवश्यकता नसते. परंतु सर्वात कनिष्ठ अशा कलियुगातून सर्वश्रेष्ठ अशा सत्ययुगात पुनर्जन्म प्राप्त करण्यासाठी श्री सत्यनारायणाच्या आत्म्यालाही पुरुषार्थ करणे अपरिहार्य असते आणि असा हा पुरुषार्थ परमात्मा अवतरित झाल्याशिवाय कोणीही करू शकत नाही. परमात्म अवतरणाचा हा संदेश संपूर्ण विश्वाला देण्याचे कर्तव्य ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी करीत आहेत. बंधुनो, केवळ ज्योतिस्वरूप परमात्माच सर्व ज्योतिस्वरूप मनुष्यात्म्यांचा पारलौकिक पिता आहे. **ह्या पारलौकिक पित्याला स्वर्गीय नवविश्वाची स्थापना करावयाची आहे. ह्या मंगलदायी स्वर्ग स्थापनेत मुख्य बाधा आहे ती अमंगल अशा मनोविकारांची! ह्या पाच विकारांमुळे तर संपूर्ण विश्वाला नरकाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. म्हणून प्रथमतः ह्या नरकांतून बाहेर पडण्याची आज्ञा परमपिता आपल्या पुत्रांना करीत आहे.** विदेही परमात्मा अकर्ता असल्याने तो सत्ययुगी स्वर्गाची स्थापना मनुष्यात्म्यांच्या द्वारेच करतो. म्हणून ह्या महान कार्यात त्याला सहयोग देण्याचे उत्तरदायित्व

**वर्तमान सयमीच्या निरस, भ्रष्ट, अशाश्वत व जीवघेण्या सिद्धांतहीन राजनीतित व्यर्थ वेळ घालविण्यापेक्षा तुम्ही परमात्म्याच्या ह्या सिद्धांतयुक्त राजनीतिला सहयोग 'द्याल' तर भविष्यात निर्विघ्न, निर्विरोध व शाश्वत असे सुखदायी रामराज्य तुम्हास प्राप्त होईल.**

प्रत्येक मनुष्यात्म्याचे आहे. स्वर्गस्थापनेत प्रत्यक्ष परमात्म्याला सहयोग देणे ह्यापेक्षा अधिक पुण्यकर्म ते कोणते असू शकेल? अंतसमयी हा पश्चाताप वाटू नये की, ''मी माझ्या परमपित्याला कसलाही सहयोग देवू शकलो नाही.'' **ह्या सहयोगीविषयी गीतेत म्हटले आहे ''हे अर्जुना, परमात्म्याने आरंभ केलेले हे सृष्टिचक्र जो ह्या लोकी पुढे चालवित नाही, अशा मनुष्याचा जन्म व्यर्थ आहे. अर्थात आपल्या ह्या जन्माचे सार्थक परमात्म्याला सहयोग देण्यातच आहे. बंधुनो, ह्या सहयोगातच आत्म्याचे जन्मजन्मांतराचे कल्याण सामावलेले आहे.**

प्रत्येक मातापित्याची हीच इच्छा असते की, आपल्या पुत्राला अथवा पुत्रीला एक चांगला जीवनसाथी प्राप्त होवून त्यांचा संसार सुरळीत चालावा. ही दैहिक दृष्ट्या विचारात घेतलेली नाण्याची बाजू. परंतु आत्मिक दृष्ट्या नाण्याची ही दुसरी बाजू विचारात घेतली जात नाही की, विवाह पश्चात त्यांच्या विषयविकारी जीवनाचा आरंभ होणार आहे. ह्या आरंभालाच सर्वांनी 'हनीनून' हे आकर्षक नांव दिले आहे. **वास्तविक ह्या हनीमून पासूनच आत्म्याच्या हानीला आरंभ होतो. (कटुसत्य) संभाव्य हानीची जाणीव व्हावी म्हणून मंगलाष्टकापूर्वी 'सावधान' हा शब्द उच्च स्वरात उच्चारला जात असावा. हा शब्द ऐकून 'नारायण ठोसर' नामक एकमात्र तरुण सावध झाला व त्याने तात्काळ पलायनाचा निर्णय घेतला. त्याच्या ह्या एका निर्णयाने पुढे तो 'रामदास स्वामी' ह्या नांवाने सुप्रसिद्ध झाला** व मनुष्याला भक्तिमार्गाने यथार्थ मार्गदर्शन करणाऱ्या 'दासबोध' ह्या ग्रंथाची निर्मिती झाली. ह्या ग्रंथनिर्मितीचा मुख्य उद्देश हाच होता की, मानवाने विकारांच्या मर्यादा ओळखाव्यात. बंधुनो, वैवाहिक जीवनाचा अर्थ असा नाही की, अंतापर्यंत मनुष्याने विकारी रहावे. त्याने आत्मकल्याणार्थ, निर्विकारी व पावन बनण्याचा पुरुषार्थ अवश्य करावा. त्यासाठीच भगवद् गीतेचे प्रयोजन आहे. परंतु आधुनिक युगाच्या नावाखाली त्या महान ग्रंथाकडे दुर्लक्ष झाले आहे. २५०० वर्षापूर्वीचा द्वापर युगातील रजोगुणी समाज अत्यल्प प्रमाणातच विकारी होता तो अधिक विकारी होवू नये म्हणून तत्कालीन ऋषी मुनींनी ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, संन्यासाश्रम व वानप्रस्थाश्रम अशा चार आश्रमांची मर्यादा समाजाला घालून दिली होती. भारतीय संस्कृती ही अधिकाधिक निर्विकारी राहण्यासाठी प्रेरित करणारी आहे. **बंधुनो, भगवदगीता ही केवळ होणा साधु संन्याशांसाठी सांगितली नसून प्रवृत्तिमार्गाचे प्रतीक असलेल्या अर्जुनासाठी अर्थात ज्ञान अर्जन करण्याऱ्या प्रत्येक अर्जुनासाठी सांगितली आहे. आपण भगवद्गीतेचे पठण केल्यास आपणास हे ज्ञात होईल की, भगवंताने कामक्रोधादि विकारांवर वारंवार टीका केली आहे.** राजयोगिनी उषा बहेनजी आपल्या प्रवचनात म्हणतात 'गीताको सभी मानते हैं, लेकिन गीताकी नही मानते!' अशा प्रकारे भगवद्गीतेच्या कल्याणकारी व श्रेष्ठ तत्वज्ञानाकडे दुर्लक्ष केल्याने मनुष्यात्मा कलियुगी पतित प्रवाहात वेगाने पतित होत चालला आहे. ह्या प्रवाहाला अधिक गती देणारे मनुष्यात्मेच आहेत. वृत्तपत्रात राजरोस छापल्या जाणाऱ्या कामुक औषधांच्या जाहिराती तद्वतच चाळीशीनंतरचे कामजीवन, साठीनंतरचे कामजीवन ह्यावरही कित्येक भाषणे दिली आहेत. विशेष म्हणजे सदरहू भाषण ऐकण्यासाठी आर्थिक मूल्य ठेवले असले तरी तेथे गर्दी केली जाते. ह्या उलट विषयविकारातून मुक्त होण्यासाठी जेथे ईश्वरीय ज्ञान ऐकविले जाते तेथे विनामूल्य प्रवेश असूनही गर्दी मात्र होत नाही. धन्य आहे मनुष्यात्म्याच्या पथभ्रष्ट होण्याची! तो अधिकाधिक पतित बनण्यासाठी आर्थिक मूल्य देत आहे. तर पुण्यात्मा बनण्यासाठी जेथे विनामूल्य ज्ञान देवून, जन्मजन्मांतराची पापकर्मे भस्म करण्याचा राजयोग शिकविला जातो, तेथे तो फिरकत नाही. ह्याचे कारण कामविकाराला विकर्म नव्हे तर गृहस्थींचे कर्तव्य मानले जात आहे. बारबालांच्यावर हजारो रुपये उधळणाऱ्या महाभागांची बातमी वृत्तपत्रात वाचल्यानंतर त्याची कीव करावी तितकी थोडीच आहे. अनेक चित्रपट व दूरदर्शनच्या मालिका समाजाला मलीन बनवित आहेत. चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व संवाद लेखक तर विषयविकारालाच प्रेम समजतात. म्हणून सदरहू चित्रपटातील नायक आपल्या अपत्यांकडे अंगुली निर्देश करुन नायिकेला सांगतो की, 'ये बच्चे हमारी प्यार की निशानियाँ है!' अशा प्रकारे आजचा मानव घोर अज्ञानामुळे विषयसागरात बुडाला आहे. ह्या विषयसागरातून मुक्त करणारा केवळ ज्ञानसागर, पवित्रतेचा सागर परमात्माच आहे तोच आत्म्याला सन्मार्गावर मार्गस्थ करणारा एकमात्र सद्गुरु व सद्शिक्षक आहे. बंधुनो, अल्पावधीतच ह्या पतित कलियुगी सृष्टीचा अणुयुद्धाद्वारे महाविनाश होवून सर्व आत्म्यांची निजधामी प्रस्थान करण्याची वेळ आली असल्याने,

सर्वांचीच वानप्रस्थ अवस्था आहे. तत्पूर्वी आपणा सर्वांनाच विकारांची ही चिखलवाट पार करण्याची आहे. साधक त्यालाच म्हणावयाचे जो ह्या वाटेवर चालत असतानाही विकाररूपी चिखल आत्म्यावर कमीत कमी कसा येईल ह्याची दक्षता घेतो. असा पुरुषार्थी साधकच आपल्या जीवनाला संपूर्ण पावन बनवितो. हे परमपित्याच्या सुपुत्रा, तूच एकेकाळी पावन पूज्य देवता होतास व आता पतित पुजारी झाला आहेस! **मनुष्यात्म्याला त्याचे सत्ययुगी पूज्यरूप स्मृतीत यावे म्हणून केवळ निराकार परमात्माच ब्रह्मामुखाद्वारे हे महावाक्य उच्चारू शकतो की, 'आपही पावन पूज्य थे और आपही पतित पुजारी बन गये हैं!'** बंधुनो, मनुष्यात्मा किती पावन अथवा किती पतित आहे हे पाहण्याचा आरसा आहे भगवद्गीता! ह्या आरशात फारच थोड्या आत्म्यांचे प्रतिबिंब पावन स्वरूपात दिसते. असे पावन स्वरूपातील प्रतिबिंब अनुभव करण्यासाठी आवश्यकता आहे गीतेचा (ईश्वरीय ज्ञानाचा) अभ्यास करुन आत्मचिंतन व परमात्म चिंतन करण्याची.

ह्या विद्यालयाच्या नावात 'ब्रह्माकुमारी' हा शब्द आल्याने सदरहू ज्ञान ब्रह्माकुमारींचे आहे, असा गैरसमज समाजात पसरला आहे. **अती धर्मग्लानी समयी परमात्मा अवतरित होतो हे गीतेतही नमूद केले आहे. फलस्वरूप हे ज्ञान कोणा देहधारी मानवाचे नसून, परमधाम मधून अवतरित झालेल्या अजन्मा ज्योतिस्वरूप परमपित्याचे आहे, तोच एकमात्र सर्व मनुष्यात्म्यांचा उद्धारकर्ता व सद्गतिदाता आहे.** बंधुनो, परमात्मा ना मच्छ, कच्छ, वराह इत्यादी प्राण्यांद्वारे अवतार घेतो, ना तो कोणत्या देवतेच्या ना संतमहात्म्यांच्या तनात अवतरित होतो. मनुष्यसृष्टीच्या ह्या महानाट्यात देवतांची भूमिका, संतमहात्म्यांची भूमिका, गुरुंची भूमिका व परमात्म्याची अनाकलनीय भूमिका ह्यात महत् अंतर आहे. ह्या अंतराला जरी जाणले तरी अहो सौभाग्य! परमात्मा केवळ साधारण मनुष्य तनातच प्रवेश करून, कलियुगाच्या अंतिम चरणात आत्मोद्धारांचे ज्ञान देतो. म्हणून गीतेत ही म्हटले आहे 'मी परमात्मा साधारण वृद्ध तनात प्रवेश करतो, (९-११) परमात्म अवतरणाच्या व त्याच्या पासून होणाऱ्या अफाट अलौकिक प्राप्तींना विज्ञानवादी मनुष्य जाणू शकत नाही, विज्ञानाने आपल्या अथक प्रयत्नांनी अनेक शोध लावले आहेत परंतु परमात्म्याचा शोध घेण्याचा तो प्रयत्न करीत नाही. स्वतःला देह मानून तो आपल्याच विज्ञानी नशेत, जीवन जगत आहे. त्याने शरीर शास्त्राच्या ज्ञानातून शरीराला ठीक करण्याचा प्रयत्न अवश्य केला आहे परंतु आत्म्याला ठीक करण्याचे तंत्रज्ञान त्याचे जवळ नाही. फलस्वरूप केवळ देहाला आवश्यक असलेल्या साधनांचाच त्याने शोध लावला आहे. विज्ञानाच्या ह्या शोधावर कोट्यावधी मनुष्यात्मे प्रभावित झाले आहेत. परंतु विज्ञान हे जाणू शकत नाही की, चारित्र्यसंपन्नता कशाला म्हणतात? मानवी मर्यादा कोणत्या आहेत? पाच मनोविकारांच्या प्राबल्यामुळे विश्वात अशांती निर्माण झाली आहे. विज्ञानवादी हा विचार कधीच करीत नाही की, मनुष्य कोणत्या कर्मामुळे पतित होतो व तो कोणत्या कर्मांच्यामुळे पावन होवू शकेल? इतिहास तज्ज्ञांनाही हे ज्ञात नाही की, ५००० वर्षापूर्वी भारतातील समस्यामुक्त, अपराधमुक्त, न्यायालयमुक्त, कारागृहमुक्त परंतु सुखशांतियुक्त व चारित्र्यसंपन्न दैवी संस्कृती परमात्म ज्ञान व राजयोगाच्या आधारे कलियुगाच्या अंतिम चरणात पुरुषोत्तम संगमयुगावर निर्माण झाली होती. **'बिगडीको बनानेवाला' हे विशेषण एका परमात्म्याचेच आहे. विज्ञान कधीही विश्वात स्थायी शांती स्थापन करू शकत नाही. तो एकमात्र अधिकार केवळ शांतिसागर परमात्म्याचाच आहे. परमात्मा कल्प कल्प (प्रत्येक ५००० वर्षांनी) विश्वात शांती स्थापन करतो** तर विज्ञान अप्रत्यक्षपणे विश्वात अशांती निर्माण होण्यासाठी निमित्त बनले आहे. आज ह्या विश्वात इतकी अणुशक्ती आहे की, त्याच्याद्वारे ह्या विश्वाचा महाविनाश सहज होवू शकेल. भविष्यात होणाऱ्या संभाव्य अणुयुद्धाच्या कल्पनेमुळे समस्त विश्वच भयभीत झाले आहे. भारतातच नव्हे तर संपूर्ण विश्वात अनेक जटील समस्या निर्माण झाल्या आहेत. ह्या समस्यांचे मूळ हे पाच मनोविकारच आहेत. कामविकाराने आपली चरमसीमा गाठल्याने केवळ अबलांच्यावर नव्हे तर छोट्या छोट्या बालिकांच्यावरही अत्याचार होत आहेत. अपहरण करून खंडणी वसूल करण्याचा प्रकार महाभयंकर आहे. संपूर्ण कुटुंबालाच नष्ट करून क्रूरपणे दरोडेखोरी केली जात आहे. सरकारने कितीही कायदे कडक केले तरी 'आम्ही मानवी 'मनाचा' थरकाप उडविणारे अधिकाधिक भीषण गुन्हे करीतच राहू' अशी जणू घोर प्रतिज्ञा ह्या क्रूरकर्म्यांनी केली असावी. क्रोधामुळे कित्येक मनुष्य आपल्याच बांधवांची हत्या करीत आहेत. ह्या हत्या होत असताना अथवा एखाद्या

अबलेवर कोणी अत्याचार करीत असताना, होणाऱ्या आक्रोशाची प्रकंपने जगभर पसरली जात आहेत. लोभामुळे आर्थिक भ्रष्टाचार शिगेला पोहचला आहे. प्रकृतीच्या अनेक आपत्ती व भिन्नभिन्न अपघातांच्या द्वारे मृत्युही होलसेलमध्ये होवू लागले आहेत. अशाप्रकारे मनुष्याचा तमोगुण वाढत चालल्याने, समस्यांनीही रौद्ररूप धारण केले आहे. सृष्टीच्या ह्या दयनीय अवस्थेवर चिंतन केल्यास तुमच्याही अंतरात्म्यातून हाच आवाज येईल की, आता ह्या सर्व समस्यांवर एकमात्र व अंतिम उपाय आहे ह्या कलियुगी पतित सृष्टीचा महाविनाश होवून, सत्ययुगी पावन सृष्टीची स्थापना होणे. केवळ अणुयुद्धाद्वारेच ह्या मनुष्य सृष्टीचा महाविनाश होवू शकतो आणि हा महाविनाश अल्पकाळात होईल, असा इशारा त्रिकालज्ञानी परमात्म्यानेही दिला आहे. **ह्या मानवी सृष्टीचा हा नियम आहे की, ज्यावेळी तमोगुण अतिमध्ये जातो त्यावेळी त्याचा अंत होवून सत्त्वगुण निर्माण होतो. मनुष्य आत्म्यात सत्त्वगुण निर्माण करण्यासाठी तर परमात्मा कल्प-कल्प अवतरित होतो.** बंधु भगिनींनो, महाविनाश अटळ असला तरी तो कल्याणकारी आहे. ज्याप्रमाणे जुन्या इमारतीचे पतन केल्याशिवाय नवीन इमारत उभारता येत नाही, तद्वतच ह्या पतित कलियुगी सृष्टीचा महाविनाश झाल्याशिवाय पावन सत्ययुगी सृष्टी निर्माण होवू शकत नाही व अशी पावनसृष्टी निर्माण झाल्याशिवाय ती समस्यामुक्त ही होवू शकत नाही.

**अशा अल्पावधीत स्थापन होणाऱ्या सत्ययुगात अर्थात दैवी युगात आपला जन्म व्हावा व आपल्या सर्वांना सत्ययुगी स्वर्गाचे सात्विक सुख ह्याच भारतात प्राप्त व्हावे, हाच ह्या लेखाचा अथवा ईश्वरीय ज्ञानाचा महत्वपूर्ण उद्देश आहे** त्यासाठी कामक्रोधादि ह्या असुरी मनोविकारांचे निर्मूलन करून, आत्म्यात पूजनीय व दैवी संस्कार धारण करणे अत्यावश्यक आहे. हे संस्कार धारण करण्यासाठी सप्ताहात किमान एक दिवस तरी ह्या विद्यालयात येणे आवश्यक आहे. जोपर्यंत आपण ह्या ईश्वरीय विद्यालयाचे नियमित विद्यार्थी बनून ज्ञान व राजयोगाचा अभ्यास करीत नाही तोपर्यंत पारलौकिक पिता परमात्मा २१ जन्मांच्या सुखशांतीचा वारसाहक्क आपणास देवू शकत नाही. ह्या ईश्वरीय ज्ञानाला अत्यल्प मनुष्यआत्मे यथार्थतः जाणत असल्याने, सृष्टीच्या आदिमध्ये अर्थात श्री लक्ष्मीनारायणाच्या राज्याभिषेकाच्या वेळी सत्ययुगात जन्मतःच दैवी गुणवत्ता असलेले केवळ नऊ लाखच मानव असतात. त्या संपूर्ण पवित्र विश्वात ना मनोविकारांचे प्रदूषण ना अन्य कोणतेही प्रदूषण! **बंधुंनो, तुम्हास ज्यावेळी परमात्म ज्ञानाची परिपूर्ण प्राप्ती होईल. त्यावेळी तुमच्या अंतरात्म्यातून हाच आवाज येईल की, मनुष्यसृष्टीला प्रदूषित करून तिचे नरकात रूपांतर करणाऱ्या देहाभिमानाचा व पाच मनोविकारांचा त्याग हा वास्तविक त्याग नव्हे!! तद्वतच असुरी गुणांचा त्याग हा त्याग नव्हे!!!** बंधुनो, आत्माभिमान, निर्विकारिता, शुचिर्भूतता, स्वधर्मात स्थित राहणे, आत्म्यात दैवी गुणांचा संचार करणे ह्या तर मानवाच्या मूळ वृत्ती आहेत. दैवी वृत्ती जागृत होण्यासाठी आसुरी वृत्तीचे निर्दालन करणे हे तर प्रत्येक मनुष्यात्म्याचे परमकर्तव्य आहे! ह्या अविनाशी रूद्र ज्ञानयज्ञात तन, मन व धनाने सेवा करणे हा वास्तविक त्याग होय! तनाद्वारे तुम्ही कर्मणा सेवा करू शकता. तुमच्याजवळ प्रवचन करण्याची कला असेल तर तुम्ही प्रवचनाद्वारे अनेक आत्म्यांना परमात्म्याचा परिचय देवून, त्याच्या अवतरणाचा दिव्य संदेश देण्याचे पुण्यकर्म करू शकता. तसेच राजयोगाद्वारे पावन स्थिती प्राप्त करून संपूर्ण विश्वाला व पाच तत्त्वांना योगदान देवू शकता. धनाद्वारे तुम्ही जितकी सेवा कराल तितके भविष्यात श्रेष्ठाचारी धनवान बनाल. अशी त्यागमय सेवा केल्यानंतर 'मी आत्म्याने त्याग केला आहे' असा संकल्पही मनात न येणे हा त्यागाचाही त्याग आहे! बंधुनो, भाग्याचा आधार त्याग आहे. आजचा त्याग हा उद्याचे तुमचे सुखशांतियुक्त स्वर्गीय दैवी भविष्य आहे. असे २१ जन्मांचे प्रारब्ध प्राप्त करण्यासाठी ह्या पुरुषोत्तम संगमयुगावर आपण मर्यादा पुरुषोत्तम बनण्याचा महान् पुरुषार्थ करूया. असे मर्यादा पुरुषोत्तम बनणे अर्थात आत्म्याने परमात्म्याची निस्वार्थ इच्छा पूर्ण करणे होय! केवळ परमात्माच ह्या विश्वाचे अंतिम सत्य आहे! म्हणूनच त्याला 'सत्यं शिवं सुंदर' म्हटले जाते : (शंकराला नव्हे) तो विदेही व ज्योतिस्वरूप असल्याने त्याला अंतिम समयी सर्व धर्मातील सर्व आत्म्यांची मान्यता प्राप्त होईल व सर्वांच्या अंतरात्म्यातून हाच आवाज येईल की, 'आम्हा सर्व मनुष्यात्म्यांचा परमपिता सद्गती दाता सद्गुरू परमात्मा ह्या धरतीवर

▶ पान नं. २७ वर

# ‘अत्त दीप भव’
## अर्थात आपला प्रकाश स्वतः बना

– **बी.के. मुग्धा तांबे**, नाशिक.

एका गावातील धर्मशाळेत विद्वान पंडिताचा काही दिवसांसाठी मुक्काम असतो. एकदा ते आपल्या परिचयाच्या व्यक्तीला पत्र लिहितात. त्या व्यक्तीने मांडलेल्या समस्यांचे निराकरण पत्राद्वारे विद्वान पंडिताने केलेले असते. सदर पत्र पोस्टाच्या पेटीत टाकण्यासाठी ते निघतात. खूप वेळ शोधूनही त्यांना पत्रपेटी सापडत नाही. शेवटी ते एका मुलाला विचारतात. मुलगा आनंदाने त्यांना पत्रपेटी दाखवतो व सहजच त्यांची चौकशी करतो. विद्वान सांगतात, मी या गावाच्या धर्मशाळेत मुक्कामाला आहे. तिथे मी सर्वसामान्यांना जीवनातील समस्यांमधून मुक्त होण्यासाठी मार्गदर्शन करतो व त्यांना मोक्षाचा अथवा जीवनमुक्तीचा मार्ग दाखवत असतो. तुलाही मी त्याविषयी मार्गदर्शन करेन. पंडितजींचे हे उत्तर ऐकून मुलगा हसू लागतो व त्यांना म्हणतो, क्षमा करा महाराज, तुम्हाला गावातली पत्रपेटी देखील सापडली नाही, तुम्ही मला जीवनमुक्तीचा मार्ग कसा दाखवणार? मुलाच्या त्या वक्तव्याने निरुत्तर झालेले पंडितजी आत्मपरीक्षण करण्यास सुरुवात करतात.

**कथा वाचून कदाचित आपल्याला तो मुलगा उद्धट वाटेल; पण थोडासा खोलवर विचार केला तर त्याचे म्हणणे पटेल. वाच्यार्थाने ही कथा समजण्याऐवजी त्यातील भावार्थ खूप महत्त्वाचा आहे. आपल्यातील काही जणांच्या बाबतीत कमी–अधिक प्रमाणात हे सत्य आहे. आपणही सर्वांना मनुष्यापासून देवता बनण्याचे ज्ञान देत असतो; परंतु कधी–कधी दैवी गुणांच्या धारणेअभावी दिव्याखाली अंधार दिसून येतो.**

आत्मपरीक्षण ही एक सूक्ष्म प्रक्रिया आहे. त्यासाठी मला स्वतः चा सत्य व यथार्थ परिचय असला पाहिजे. आपण जसे आरशात बघून स्वतःचे निरीक्षण करतो, त्याचप्रमाणे मनरूपी दर्पणात स्वतःला पाहता आले पाहिजे. स्वतःतील कमतरता, क्षमता इत्यादी गोष्टींची योग्य ओळख जर आपल्याला असेल, तर जीवन मार्गातील अंधार दूर करणे सहज शक्य आहे.

विजेचा शोध लागण्यापूर्वी वा तिचा वापर सर्वदूर होण्यापूर्वी, सूर्यास्तानंतर घराबाहेर पडणारी व्यक्ती वा प्रवास करणारे आपल्या बरोबर कंदील अथवा तत्सम प्रकाश देणाऱ्या वस्तू बरोबर बाळगत. विजेच्या प्रसार व प्रचारानंतर या गोष्टींची गरज कमी झाली. रस्तोरस्ती पथदीप आले. प्रवासाचा मार्ग काही प्रमाणात सुकर झाला. प्रवासाची साधने बदलत गेली. आज विज्ञानयुगात रात्रीचा प्रवास खूपच जलद व सुलभ झाला आहे; पण अजूनही अनेक छोटे रस्ते असे आहेत जेथे पथदीपांचा प्रकाश नसतो, तर आपल्याला गाडीच्या प्रकाशातच मार्गक्रमण करावे लागते. जर गाडीचे दिवे योग्य प्रकाश देत नसतील तर अपघात होण्याची शक्यता वाढते. आपल्या जीवनरूपी मार्गावरही सुकर प्रवासासाठी स्वतःचा प्रकाश आवश्यक आहे.

तथागत गौतम बुद्धांनीही ‘अत्त दीप भव’ या वचनातून आपला परम शिष्य आनंद याला हाच संदेश दिला. तथागतांनी दिलेल्या ज्ञानामुळे आनंदसारख्या अनेकांचे जीवन उजळून निघाले. त्यातील काही जणांनी त्या ज्ञानप्रकाशाद्वारे आपला आत्मदीप प्रज्वलित केला; पण चाळीस वर्षे गौतम बुद्धांबरोबर सतत राहूनही आनंदला ते जमले नाही. शेवटी ती वेळ येऊन ठेपली. गौतम बुद्धांच्या देहत्यागाची वेळ जवळ येत चालली. चाळीस वर्षे तथागतांच्या ज्ञानप्रकाशात जीवन प्रवास करणारा आनंद, त्यांच्या निर्वाणाच्या कल्पनेने घाबरून गेला. त्याला वाटले, आता आपले जीवन अंधःकारमय झाले. म्हणून त्याने तथागतांजवळ स्वतः च्या जीवन प्रवासाविषयी चिंता व्यक्त केली. **त्यावर गौतम बुद्धांनी त्याला सांगितले, तुझा जीवनमार्ग सुकर करण्यासाठी ‘अत्त दीप भव.’ अर्थात आपला प्रकाश स्वतः बन. कोणीही**



**आत्मपरीक्षण ही एक सूक्ष्म प्रक्रिया आहे. त्यासाठी मला स्वतःचा सत्य व यथार्थ परिचय असला पाहिजे. आपण जसे आरशात बघून स्वतःचे निरीक्षण करतो, त्याचप्रमाणे मनरूपी दर्पणात स्वतःला पाहता आले पाहिजे.**

**इतर व्यक्ती वा गुरू सदा काळाकरता दुसऱ्याचा जीवनमार्ग प्रकाशित करू शकत नाही. त्याकरता स्वतःचा प्रकाश बनावे लागते.**

आपल्या जीवनाचा प्रकाश शोधण्यासाठी सद्‌गुरूची मदत होते; पण पुढील मार्गक्रमण आपल्यालाच करावयाचे असते. प्राणप्रिय शिवबाबांनी आपला आत्मारूपी दीपक जागृत केला पण त्याला सतत तेवत ठेवण्यासाठी, आपल्यालाच प्रयत्न करावयाचे आहेत. स्थूल दीपक तेवत राहण्यासाठी अनेक गोष्टींचे व्यवधान बाळगावे लागते. दिवा कोठे गळत नाही ना, हे तपासावे लागते, त्यातील तेल संपणार नाही याची काळजी घ्यावी लागते. वाऱ्यापासून त्याचे रक्षण करावे लागते. तेवणाऱ्या ज्योतिवर काजळी धरणार नाही, याची खबरदारीही घ्यावी लागते. वात तेलात बुडून ज्योत विझत तर नाही ना, यावरही लक्ष ठेवावे लागते. तेव्हाच तो दिवा सतत प्रकाशित राहतो व इतरांनाही प्रकाश देत राहतो.

आत्मारूपी दीपकाचीसुद्धा अशीच काळजी घ्यावी लागते. **शिवबाबांनी आपली ज्योत प्रज्वलित करून दिली; पण तिचे रक्षण करणे व तिच्या पासून प्रकाश प्राप्त करून घेणे तसेच त्याचा लाभ इतरांनाही करून देण्याची जबाबदारी आपली आहे. आत्मारूपी दीपकाला कोठेही विकारांचे छिद्र पडले नाही ना, याची खात्री करून घ्यायची आहे. त्यात योग्य प्रमाणात ज्ञानरूपी घृत घालण्याची जबाबदारीही आपलीच आहे. जर ज्ञानरूपी तेल कमी झाले तर आत्मज्योति विझण्याची शक्यता वाढते. म्हणूनच रोज ज्ञानसागर परमात्म्याने दिलेल्या ज्ञानाचे श्रवण, मंथन करणे जरूरीचे आहे.** स्थूल दिव्यात जर तेल जास्त झाले तरीही तो विझतो. व सांडलेल्या तेलाने त्याचे स्थान खराब होते. तसेच एक विचित्र वास वातावरणात पसरतो. ज्ञानरूपी तेल जर योग्य प्रकारे धारण केले नाही, त्यातून विपरीत अर्थ निर्माण करत गेलो तर आत्मारूपी दीपक विझत जाईल, विकर्मांचे डाग पडतील व गुणांचा सुगंध पसरण्याऐवजी अवगुणांची दुर्गंधी पसरेल. वाऱ्याची छोटीशी झुळुक मनाला प्रसन्न करते. पण मायेची छोटीशीच झुळूक आत्मज्योतिला ध्वस्त करू शकते. विविध अवगुणांची, व्यर्थ संकल्पांची काजळी आत्मज्योतिचे तेज कमी करते. तसेच वात जळून जाण्याची शक्यताही वाढवते. म्हणूनच वारंवार वातीची काळजी घ्यावी लागते. अर्थात शिवबाबांनी सांगितलेल्या धारणांची जीवनात अंमलबजावणी करावी लागते, तरच आत्मज्योति तेजाने तळपते. आत्मारूपी दीपक जागृत ठेवण्यासाठी केवळ ज्ञान असून पुरेसे नाही तर शिवबाबांची आठवणही तेवढीच महत्त्वाची आहे. दिवा जर सतत तेवत ठेवायचा असेल तर त्यासाठी योग्य स्थान शोधावे लागते. तसेच आत्मज्योति प्रकाशमान ठेवण्यासाठी भृकुटीरूपी सिंहासन सर्वात सुयोग्य स्थान आहे.

वरील सर्व गोष्टी आपल्या जीवनात यथार्थ आणल्या असतील तरच आपण आपला जीवनपथ स्वतःच प्रकाशमान करू व त्याचबरोबर इतरांचा जीवनमार्ग उजळवण्यासही मदत करू. ह्यातच सेवा सामावली आहे. अशा पद्धतीने बलवान झालेला आत्मा मायारूपी तुफानाला सहज तोंड देऊ शकेल.

**वाचकहो! याच महिन्यात येणाऱ्या दिवाळीच्या सणासाठी आपण वेगवेगळी तयारी करतो. शांत शीतल प्रकाश देणाऱ्या पणत्यांची जागा आता झगमगत्या विद्युत रोषणाईने घेतली आहे. दिवाळीची रंगत त्यामुळे वाढली आहे. मायेच्या या झगमगत्या दुनियेत आपली आत्मजागृतीची एक पणती सतत प्रकाशमान ठेऊ या. स्वयं प्रकाशित होऊ या व इतरांचे पथप्रदर्शक होऊन साजरी करूया, खरी दीपावली.**

▶ पान नं. २५ वरुन

आला आहे!' त्याचबरोबर भिन्न-भिन्न साक्षात्कारांद्वारे परमात्मा अवतरित झाल्याचे सर्वांनाच जाणवेल. **बंधुनो, भाग्यवान मनुष्य आत्मे तेच आहेत, जे वर्तमान समयी ज्ञाननेत्राने परमात्म्याला व त्याच्यापासून होणाऱ्या अलौकिक प्राप्तींना यथार्थतः जाणून, राजयोगाद्वारे त्याची अनुभूती प्राप्त करतील. केवळ राजयोगच आत्म्याला पावन स्थिती प्राप्त करवून देणारा योग आहे. कारण तो स्वतः पतितपावन शिव परमात्म्याने शिकविला आहे. हे सूज्ञ वाचकांच्या ध्यानात येईलच.**

▶ पान नं. १६ वरुन

**क्रोधावर विजय मिळविण्याच्या काही युक्त्या–**

१)क्रोधमुक्त होण्यासाठी सर्वात सोपी युक्ती म्हणजे क्रोधरूपी 'अक' चे फूल शिव परमात्म्याला अर्पण करा. तसेच ते पुन्हा कधीही परत न घेण्याचा दृढ संकल्प करा.

२) क्रोधमुक्त होण्यासाठी 'ॐ शांती' या महामंत्राचा शस्त्र म्हणून वापर करा.


३) क्रोधमुक्त होण्यासाठी पुढील स्वमानांचा वापर करा. – मी सहनशक्तीचा अवतार आहे, मी शीतला देवी वा शीतल देव आहे, मी स्नेहसागर शिवबाबांचा पुत्र मास्टर स्नेह सागर आहे. मी पूर्वज व पूज्य आत्मा आहे.

४) कर्माची गुह्यगती नीट समजून घ्या. आपल्या जीवनातील प्रत्येक घटना अथवा परिस्थिती ही आपल्याच गतकर्माचा परिणाम आहे. जर कोणी आपल्याला त्रास देत असेल, आपल्यावर अधिकार गाजवत असेल, आपला अपमान करत असेल तर या सर्व गोष्टी आपल्याच मागील कर्मांची प्रतिक्रिया आहे, असे समजा. त्यामुळे आता सहन करून दुसऱ्यांविषयी शुभभावना बाळगा.

५) कोणत्याही नकारात्मक गोष्टींचे सकारात्मक गोष्टीत परिवर्तन करा. उदाहरणार्थ जर कोणी अपमान केला वा शिवी दिली तर असे समजा की त्याने मला गुलाबाचे फूल दिले, कारण जो आपला अपमान करतो वा शिवी देतो, तोच भक्तिमार्गात गुलाबाचे फूल वाहून आपल्या मूर्तीची पूजा करतो.

६) 'जशी क्रिया तशी प्रतिक्रिया' हा सिद्धांत जीवनात सर्वत्र लागू आहे. त्यामुळे जर आपण दुसऱ्यांशी मधुर, हळूवार व शांतपणे बोललो तर तशीच प्रतिक्रिया दुसऱ्यांकडून प्राप्त होते. परिणामतः आपण क्रोधापासून दूर राहू शकतो.

**संगमयुगात आपले प्रत्येकाचे लक्ष्य आहे – सर्वगुण संपन्न, १६ कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी.... बनण्याचे. ते साध्य करण्यासाठी आता तीव्र पुरुषार्थ करू या आणि अक्रोधी, शीतल, मधुर व शांत स्वभावी बनू या.**



▶ पान नं. १० वरुन

**वर्तमानकाळ हा कलियुगाचा अंत आणि स्वर्णिम सत्य युगाच्या आगमनाचा संधीकाळ वा संगमयुग आहे. शिव परमात्म्याने विश्वातील प्रत्येकाला आपले भाग्य बनविण्याची संधी दिली आहे.**

कष्टमय असेल तर त्यासाठी दुसरे कोणी जबाबदार नसून फक्त तुम्हीच जबाबदार आहात. त्यामुळे देवाला किंवा इतराला दोष देण्यात अर्थ नाही.

एका गाडीवर सुंदर वाक्य लिहिले होते. ''जिसके लिए दिन–रात मेहनत करते हो, वह सब यहाँही छोडकर जाना है ।'' मनुष्य जीवनभर गाडी, बंगला जे काही मिळवतो त्यातले अंतसमयी काहीही सोबत घेऊन जात नाही. जगाच्या पाठीवर राज्य करणाऱ्या सम्राट सिंकदराने सुद्धा अंतसमयी आपले दोन्ही रिकामे हात बाहेर काढायला सांगितले होते. पण आता परमपिता शिव परमात्मा समजावून सांगतात की, 'जरी वस्तु–वैभव तुमच्या सोबत येत नसले तरी पाप आणि पुण्याचा घडा हा सोबत कायमच राहतो. 'वर्तमानकाळ हा कलियुगाचा अंत आणि स्वर्णिम सत्ययुगाच्या आगमनाचा संधीकाळ वा संगमयुग आहे. शिव परमात्म्याने विश्वातील प्रत्येकाला आपले भाग्य बनविण्याची संधी दिली आहे. **संगमयुगावर परमात्म्याच्या श्रीमतांच्या आधारे, श्रेष्ठ कर्मरूपी बीजातून भविष्य एक नव्हे, दोन नव्हे तर एकवीस जन्मांचे भाग्य निर्माण करू शकता. प्रत्येकाने या हिरेतुल्य संधीचा अवश्य लाभ घ्यावा, हीच मंगलकामना!**

# कारागृहातील माझा अनुभव

– **ब्र.कु. तानाजी पोटपळे**, नांदेड कारागृह.

मी तानाजी रामराव पोटपळे रा. शेवडी (बा) ता. लोहा जि. नांदेड. माझ्या गावात दोन खून झाले आहेत. त्या प्रकरणामध्यें माझे नाव दिले गेले आहे. त्यामुळे मी दि. ७/९/२०१२ पासून नांदेडमधील कारागृहात बंदिस्त आहे.

माझे आजवरचे जीवन खूपच दुःखात गेले आहे. मी कारागृहात (जेलमध्ये) येण्यापूर्वी दररोज दारू पीत होतो, तंबाखू खात होतो व मांसमटण देखील खात होतो. मी या सवयीपासून परावृत्त होण्याचा प्रयत्न करत होतो, पण माझी या वाईट सवयींपासून सुटका होत नव्हती. जेलमध्ये तर बहुतेक जण व्यसनीच होते. तेथे असताना एके दिवशी प्रजापिता ब्रह्माकुमारी कैलासनगर, नांदेडच्या मुख्य संचालिका ब्र.कु. शिवकन्या बहेन व ब्र.कु. गंगाधर भाई यांनी आमच्या कारागृहाचे अधीक्षक श्री.गोविंद राठोड साहेब यांची भेट घेऊन, राजयोग शिबिराची अनुमती घेतली व त्यानंतर ब्र.कु. गंगाधर भाई यांनी प्रत्येक बॅरेक मध्ये ७ दिवसाचा कोर्स पूर्ण केला व त्यातून इच्छुक ६० कैदी बांधवांना दररोज मुरलीचे ज्ञान, ब्र.कु. गंगाधर भाई व ब्र.कु. नागनाथ भाई यांच्याकडून देण्यात येत आहे. आम्ही सर्व कैदी बांधव या सेवाधारी बंधु-भगिनींचे खूप खूप ऋणी आहोत. त्यांच्याकडून आम्हाला जे निस्वार्थ प्रेम प्राप्त होते, त्यातूनच आम्हाला स्वपरिवर्तनाची प्रेरणा मिळते.

सन २०१६ मधील पार पाडलेल्या रक्षाबंधनाच्या दिवशी सेंटरच्या मुख्य संचालिका ब्र.कु. शिवकन्या बहन यांनी जेलअधीक्षक श्री. राठोड साहेब यांच्या उपस्थितीत सविस्तरपणे मार्गदर्शन केले. त्या कार्यक्रमात ३५ बंदी बांधवांनी सर्व प्रथम धूम्रपानमुक्त होण्याचे अभिवचन बहेनजींना दिले व ते आजही धूम्रपानमुक्त आहेत. यापुढेही राहतील. तसेच माऊंट आबू येथून जे कोणी ज्ञानी बंधु भगिनी येतात, त्यांनाही बहेनजी कारागृहात मार्गदर्शन करण्यासाठी पाठवित असतात. सन २०१६ मध्ये ब्र.कु. नंदादीदी व ब्र.कु. प्रभादीदी यांनी करागृहात येऊन आम्हाला खूपच अलौकिक असे मार्गदर्शन केले.

शिवबाबांच्या या दिव्य ज्ञानामुळे आमच्या जीवनात आमूलाग्र असा बदल झालेला आहे. मी व्यसन सोडले आहे. व माझ्या सोबतचे अनेक सहकारी व्यसनांपासून मुक्त झाले आहेत. आम्ही ओम शांतीचे ज्ञान ऐकण्याच्या अगोदर खूपच ताण तणावाखाली राहत होतो. आम्हाला सतत फक्त नकारात्मक (निगेटीव्ह) विचारच मनात येत होते. या विचारांमुळे आम्ही नेहमी आजारी पडत असू. पण शिवबाबांचे दिव्य व पवित्र सकारात्मक ज्ञान ऐकत व आत्मसात करीत असल्यापासून नकारात्मक विचार कमी होत-होत, आज आम्हाला नकारात्मक (निगेटीव्ह) विचार स्पर्श देखील करीत नाहीत. व आम्ही आता चिंतामुक्त, भयमुक्त झालो आहोत. आम्हाला समजले आहे की, आम्ही जिथे आहोत ते ड्रामानुसार आहोत. माझ्यामध्ये कोणाबद्दलही द्वेष भावना अथवा वाईट विचार येत नाहीत. अगदी ज्यांच्यामुळे मी कारागृहात आहे त्यांच्याबद्दल देखील मला चांगले विचार येत आहेत. मी त्यांचा आभारी आहे; कारण त्यांच्यामुळे मला कारागृहात शिवबाबांचे ज्ञान ऐकायला मिळाले व एक क्रूर तानाजी आता सकारात्मक विचारांचा, आनंदी व मधुरभाषी तानाजी बनला आहे.

मला कारागृहात देखील शिवबाबांची खूपच मदत झाली. माझ्या पत्नीला साप चावला होता. ती नांदेडच्या शासकीय रुग्णालयामध्ये तीन दिवस ॲडमिट होती. मी कारागृहात असल्याने माझा मुलगा व मुलगी दवाखान्यामध्ये

**आज आम्हाला नकारात्मक (निगेटीव्ह) विचार स्पर्श देखील करीत नाहीत, व आम्ही आता चिंतामुक्त, भयमुक्त झालो आहोत. आम्हाला समजले आहे की, आम्ही जिथे आहोत ते ड्रामानुसार आहोत. माझ्यामध्ये कोणाबद्दलही द्वेष भावना अथवा वाईट विचार येत नाहीत. अगदी ज्यांच्यामुळे मी कारागृहात आहे त्यांच्याबद्दल देखील मला चांगले विचार येत आहेत.**

रात्रभर शिवबाबांची आठवण करीत होते. या आठवणीमुळे माझी पत्नी बरी झाली व सुखरूप घरी गेली, ही सारी शिवबाबाचीच किमया होती. दुसरी गोष्ट म्हणजे माझी मुलगी ज्योती हिला माझी सख्खी बहीण व भाऊजी यांनी, त्यांच्या मुलासाठी स्वतःहून मागणी घातली. त्यावेळी मला खूपच आनंद झाला. मी बहिणीला म्हटले, आता तर मी कारागृहात आहे व माझ्याकडे लग्नासाठी पैसे देखील नाहीत. यावर बहीण व भाऊजी म्हणाले की आम्हाला फक्त तुझी मुलगी पाहिजे. पैसा वगैरे काही नको. लग्नाचा सगळा खर्च आम्हीच करू. येवढेच नव्हे तर तुझ्या मुलीला आम्ही आमची मुलगी समजून तिला कधीही दुःख देणार नाही. अशा प्रकारे माझ्या अनुपस्थितीत माझ्या मुलीचे शुभमंगल झाले. (आता माझ्या मुलीला शिवप्रशांत नावाचं गोंडस बाळ देखील झाले.) मला तर या सगळ्याच गोष्टीचं आश्चर्य वाटते. प्रत्येक पालकाला आपल्या मुलीचे लग्न जुळवण्यासाठी किती फिरायला लागते. लग्नासाठी पैसा उभा करताना त्याला किती त्रास होतो; परंतु मला मात्र काहीही करावे लागले नाही. तात्पर्य म्हणजे शिवबाबांवर जर आपला दृढ विश्वास असेल तर सगळ्या गोष्टी अगदी सहज पार पडतात.

यापुढची सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे माझ्या विरोधात जवळपास १५ साक्षीदार होते. ते आता मला भेटण्यासाठी कारागृहात येत असतात व मला स्वतःहून सांगतात की आता आम्ही तुझ्या विरोधात कोर्टात साक्ष देणार नाही. यामुळे अर्थातच माझी या प्रकरणी निर्दोष सुटका होईल, अशी खात्री आहे. कारण शिवबाबांचा आशीर्वाद माझ्या पाठीशी आहे. दुसरं म्हणजे मला काही वर्षापासून फीटस् येत होत्या. त्यासुद्धा आता बंद झाल्या आहेत. आता मला डॉक्टरची देखील गरज पडत नाही. कारण सुप्रीम सर्जन शिवबाबाच माझे डॉक्टर बनले आहेत.

मी रोज सकाळी अमृत वेळेला योगामध्ये शिवबाबांशी 'रूहरिहान' (वार्तालाप) करीत असतो. त्यामुळे जीवनात येणाऱ्या सर्व समस्यांवर शिवबाबांकडून मार्गदर्शन प्राप्त होते. मुख्य म्हणजे मी कारागृहात रोज शिवबाबांची मुरली ऐकत असतो. तसेच दिवसभरात जो वेळ मला मिळतो, त्यावेळी मी दुसऱ्या कैदी बांधवांना ज्ञान देण्याची सेवा करतो. अशा रितीने मी कैदेत जरी असलो तरी माझी दिनचर्या शिवबाबांच्या श्रीमतानुसार चालू आहे. फलस्वरूप शिवबाबांच्या मदतीचा अनुभव वेळोवेळी होत आहे.

आता फक्त जीवनाचे एकमेव ध्येय आहे की जेलमधून सुटल्यानंतर आपल्या गावी शेवडी (बा) येथे स्वतःच्या जागेत ब्रह्माकुमारीजची गीता पाठशाळा उघडायची. गावातल्या लोकांना ईश्वरीय ज्ञान देऊन त्यांचे जीवन सुख-शांतीमय बनवायचे. त्यांना व्यसनमुक्त, तणावमुक्त, भांडण-तंटा मुक्त बनवायचे. त्यांच्यात प्रेम, एकता, सद्भावना पसरवून शेवडी गाव हे शिवालय बनवायचे.

▶ पान नं. २१ वरुन

अधिक प्रभावित होतो. परिणामतः आणखीनच नकारात्मक ऊर्जा प्रवाहित करू लागतो. आपल्या जवळची व्यक्ती सुखी झाल्याची जेव्हा आपल्याला जाणीव होते तेव्हा त्याचा प्रभाव लगेचच आपल्यावर पडतो. कारण आपले त्याच्यावर अवलंबित्व असते.

यावरून आपल्या लक्षात आले असेल की आपली खुशी नष्ट करणाऱ्या प्रामुख्याने दोन गोष्टी आहेत. १. परावलंबित्व अर्थात आपली खुशी दुसऱ्यावर अवलंबून असणे. २. भीती वा असुरक्षितता. यातून मुक्त होण्यासाठी **सदैव हे लक्षात ठेवा की ''मी सदा खुश आहे, मी निर्भय आहे, मी सत्-चित्-आनंद स्वरूप आहे. खुशी हा माझा मूळ स्वभाव आहे. माझी खुशी कोणावरही अवलंबून नाही. आजपर्यंत मी पुष्कळ ठिकाणी खुशी शोधली.... लोकांमध्ये.... वस्तूंमध्ये....परिस्थितीमध्ये.. सर्वत्र शोधत राहिलो, परंतु आता मला हे समजून चुकले आहे की खुशी सदैव माझ्या सोबत आहे कारण तेच मज आत्म्याचे स्वरूप आहे. आजवर मी खुशी बाहेर शोधत होतो; परंतु खुशी ही तर माझीच अविनाशी संपत्ती आहे. त्यामुळे आज मी तिचे दान दुसऱ्यांना देत आहे.''**

(आधार : 'हॅपी लिव्हिंग ' भाग - १)



# तू दीपस्तंभ बाबा ...(अनुभव)

– **ब्र. कु. सुंदरा बोऱ्हाडे**, वाशी, नवी मुंबई

मी, माझे पति, एक मुलगा, एक मुलगी असा आमचा छोटा, सुखी परिवार होता. भक्तिमार्गात मी व माझे पति अगदी पक्के होतो. पूजा – अर्चा, भजन, कीर्तन, तीर्थयात्रा या आधारे लौकिक संसार व्यवस्थित, छान चालला होता. आम्ही जास्त भक्ती शंकराची करीत होतो. आमचे गाव बारा ज्योतिर्लिंगांपैकी असलेल्या भिमाशंकरच्या पायथ्याशी असल्याने, नेहमी तिथे जाणे असायचे. लौकिक परिवारामध्ये माझे पति, सर्व भावंडांमध्ये मोठे असल्यामुळे कुटुंब प्रमुख म्हणून त्यांचा मान आणि समाजात प्रतिष्ठा चांगली होती. मी देवाजवळ नेहमी प्रार्थना करायची की माझ्या जीवनाची ही घडी अशीच व्यवस्थित राहू दे, आणि मला अखंड सौभाग्यवती ठेव.

यथावकाश मुलाचे लग्न झाले आणि तेव्हापासूनच सुखी संसाराची घडी विस्कटायला सुरुवात झाली. मुलाच्या आणि सुनेच्या सततच्या भांडणाला कंटाळून दीड वर्षाच्या नातवाला घेऊन सून कायमची माहेरी निघून गेली. मुलगा एकाकी पडल्यामुळे व्यसनांच्या आहारी गेला. घरात सतत तणावाचे वातावरण राहू लागले. या घटनांमुळे अचानक मानसिक धक्क्याने एप्रिल २००२ मध्ये लौकिक पतिचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. माझ्यावर आभाळच कोसळले. मी अत्यंत उदास, बेचैन झाले. मन अशांत, बुध्दी भ्रमिष्ट झाली. मन कशातच लागेनासे झाले. आधी मी देवाजवळ अखंड सौभाग्यवतीचे वरदान मागायची परंतु माझ्या नशिबी विधवेचे जगणे आले. विधवेला समाजात, शुभकार्यात कुठेही मान नसतो. या अपमानास्पद जगण्यापेक्षा जीवनाचा अंत केलेला बरा म्हणून मी आत्महत्येचा निर्णय घेतला. आमच्या गावाच्या जवळ असलेल्या खाडीजवळ गेले, पण तिथे अनेक मच्छीमार लोक उभे होते. त्यामुळे विचार आला की आता जर खाडीत उडी घेतली तर हे लोक मला वाचवतील. म्हणून थोड्या वेळाने परत येऊ. तोपर्यंत ते निघून जातील, असे म्हणून सहज पाय जातील तिकडे चालू लागले.

चालता चालता एका उद्यानात येऊन पोहोचले. मी गेली ९ वर्षे त्या गावात रहात असूनही कधीच ते उद्यान पाहिले नव्हते; परंतु आज नकळत कशी पोहचले, देवच जाणे. तेथे एके ठिकाणी एक सफेद साडी घातलेली स्त्री एका पुस्तकातल्या चित्रांवर काहीतरी सांगत होती. ती स्त्री हिंदीतून बोलत असल्याने, मला फारसे काही समजले नाही पण ती स्त्री वारंवार शिवबाबा, शिवबाबा म्हणत होती. मी शंकराची भक्त असल्याने मला शिवबाबा शब्द खूप आपलासा वाटला. मन अगोदरच खूप बेचैन असल्याने 'बाबा' शब्द ऐकून डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यावेळी माझ्या कानावर शब्द पडले की या धरतीवर सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग कलियुग अशी चार युगे येतात; व आता कलियुगाचा अंत आहे. अशावेळी 'शिवबाबा' जे आपणा सर्व आत्म्यांचे पिता आहेत, ते या दुःखदायी दुनियेतून, सुखदायी दुनियेत आपल्याला घेऊन जाण्यासाठी अवतरीत झाले आहेत. हे ऐकून मनात कुठेतरी आशेचा किरण जागृत झाला. दुःखाची तीव्रता कमी झाली. आपण घरातून कशासाठी बाहेर पडलो होतो हे ही विसरून गेले. सर्वात शेवटी त्या स्त्रीने सांगितले की दुसऱ्या दिवशी मराठीतून प्रवचन करण्यासाठी दीदी येणार आहेत. त्यामुळे मला तर फारच आनंद झाला. खाडीकडे जाताना जड पावलांनी गेलेली मी अगदी आनंदात घरी गेले व दुसऱ्या दिवसाची वाट पाहू लागले.

ठरल्यावेळी संध्याकाळी उद्यानात पोहोचले. तेथे एक दीदी 'कर्माची गुह्य

**अगोदरच खूप बेचैन असल्याने 'बाबा' शब्द ऐकून डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्यावेळी माझ्या कानावर शब्द पडले की या धरतीवर सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग कलियुग अशी चार युगे येतात; व आता कलियुगाचा अंत आहे. अशावेळी 'शिवबाबा' जे आपणा सर्व आत्म्यांचे पिता आहेत, ते या दुःखदायी दुनियेतून, सुखदायी दुनियेत आपल्याला घेऊन जाण्यासाठी अवतरीत झाले आहेत.**

**परिस्थिती भले अनेक येतात व जातात. पण 'सदैव बाबा सोबत आहे' ही आठवण आपल्याला खूप बळ देऊन जाते.**

गती' या विषयावर प्रवचन करत होत्या. ते संपूर्ण प्रवचन मला कळले व फार आवडले. मला ते ज्ञान आपलेच असल्यासारखे वाटले. माझा आनंद गगनात मावेनासा झाला. मी रोज रोज ते ज्ञान ऐकण्यासाठी जाऊ लागले. **थोड्या दिवसांनी सेंटरवर सकाळच्या मुरली क्लासला जाऊ लागले.पाहता-पाहता माझे आयुष्यच पूर्णपणे बदलून गेले.** **शिवबाबांनी एका मुरलीत सांगितले, ''बच्चे कभी रोना नही। विधवा रोती है। तुम्हे तो पतियोंका पति मिला है। ऐसा साजन मिला है जो अजर, अमर, अविनाशी है। वह तुम्हारा साथ कभी छोडेगा नही। तुम सौभाग्यशाली तो क्या पद्मापद्म भाग्यशाली आत्मा हो।'' हे ऐकून माझ्या खुशीचा पारावार राहिला नाही. मी विधवा होण्याचे दुःख घेऊन बसले होते. शिवबाबांनी मला एका क्षणात सौभाग्यशाली बनवून टाकले. जीवनातील नैराश्याची जागा आता सुख-शांती व आनंदाने भरून गेली.**

हळूहळू माझ्या मुलालाही हे ज्ञान मी दिले. त्यालाही ते फार आवडले. तो ही सुधारण्याचा प्रयत्न करू लागला. साप्ताहिक कोर्स झाल्यावर तोही कधी-कधी मुरलीला येऊ लागला. मुलाबरोबरच मी मुलीलाही ज्ञान दिले. तिलाही ज्ञान आवडले. व ती तर बाबांची पक्की बच्ची बनली. रोज मुरली ऐकू लागली.

परंतु बाबांचे बनल्यावर परिस्थिती रूपी पेपर अधिकच कडक येतात. व मायाही ठोकून-ठोकून आपली परीक्षा घेते. थोड्याच दिवसांनी मे २००५ मध्ये एका दुर्धर आजाराने माझ्या मुलाचे वयाच्या अवघ्या ३५ व्या वर्षी निधन झाले. मी मात्र बाबांच्या ज्ञानामुळे ड्रामाच्या पटरीवर स्थिर होते. शरीर सोडण्याच्या दिवशी मुलाने सकाळी मुरली ऐकली व बाबा-बाबा करत शांतपणे शरीर सोडले. एकुलता एक मुलगा डोळ्यासमोर जगाचा निरोप घेत असतानाही मन स्थिर होते. स्थिती अचल, अडोल होती. बाबांचे शब्द आठवत होते. आत्मा अजर, अमर, अविनाशी आहे. शरीर विनाशी आहे. माझ्या मुलाचा माझ्यासोबतचा पार्ट इथपर्यंतच होता. आता फक्त हे शरीर सोडून जिथे त्याचा पुढच्या प्रवासाचा पार्ट असेल तिथे तो जाईल. **बाबा माझ्या सोबत आहेत हा विश्वास अटळ होता. 'बच्चे, चिंता मत करो मै बैठा हूँ।' बाबांचं हे चित्र मला खंबीरपणे जगण्याचं बळ देत होतं. आतापर्यंत आयुष्यात जे घडलं, त्याला साक्षी होऊन पाहण्याची शक्ती मला बाबांनी दिली.**

आमचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय होता. आता त्याचा वाली कोण? मी मुळातच अक्षरशून्य; पण त्यातही एक बल, एक भरोसा होऊन मी चालत राहिले. भक्तिमार्गातही म्हणतात, 'आंधळ्याच्या गायी देव सांभाळतो' बाबांनी इथेही माझ्या मुलाच्या मित्राला व्यवसाय सांभाळण्यासाठी निमित्त बनवले. तो ही अत्यंत प्रामाणिकपणे सर्व कारोबार सांभाळतो. व त्यामुळे आमची आर्थिक परिस्थितीही सुधारली. परंतु अजूनही परीक्षा यायच्या काही थांबल्या नाहीत. थोड्या दिवसांनी मुलगीही पतीपासून विभक्त होऊन तिच्या दोन मुलींसह माझ्याकडे आली. ड्रामाची भावी म्हणून याही गोष्टीचा मी स्वीकार केला. बाबा म्हणतात, 'ड्रामा कल्याणकारी आहे. जे होतं ते चांगल्यासाठी होतं' मुलीचा ज्ञानाचा मार्ग मोकळा झाला. ती ही सगळ्या धारणा करू लागली आणि बाबांची पक्की बच्ची बनली. आम्हा चौघींचा आता बाबाच सहारा आहे. बाबांनी सगळा बोझ स्वतःकडे घेऊन आम्हांला अगदी फुलासारखे सांभाळले आहे. खरोखर वा! बाबा वा! वा। ड्रामा वा!

तात्पर्य म्हंणजे परिस्थिती भले अनेक येतात व जातात. पण 'सदैव बाबा सोबत आहे' ही आठवण आपल्याला खूप बळ देऊन जाते. म्हणूनच या ७५ व्या वर्षी सुद्धा माझा सकाळचा मुरली क्लास अखंडपणे चालू आहे. शरीराला काही व्याधींनी ग्रासले आहे. डॉक्टरांनी घरातून बाहेर पडल्यास मनाई केली आहे तरीही सुप्रीम सर्जनच्या आज्ञेने मी मुरली क्लासला जातेच. म्हणून बाबांची मदत मला पावलोपावली मिळते आणि मनातून उद्‌गार निघतात...

**तू दीपस्तंभ बाबा,**
**जगतास लाभलेला!**
**उज्ज्वल तुझ्या प्रकाशे,**
**काळोख दूर झाला!**
**हा जन्म सार्थ करण्या,**
**बाबा तुझ्या मुलीने ।**
**अनमोल रत्ने देशी,**
**रोज ज्ञानमुरलीने ।**
**भाग्यविधाता, वरदाता ।**
**तुझिया रूपात दिसला ।**
**उज्ज्वल तुझ्या प्रकाशे,**
**काळोख दूर झाला ।।**

पान नं. २ वरुन

**होईल व सृष्टीवर पुन्हा सर्वत्र सुख-शांती-समृध्दीचे साम्राज्य स्थापन होईल.** अशाप्रकारे प्रत्येक कल्पाचे अंती (कलियुगात) शिव परमात्मा अवतरित होऊन दिव्य कर्तव्य करतात. याचेच प्रतीक म्हणून शिव मंदिरात दीपस्तंभ उभारलेला असतो या दीपस्तंभात सर्वात वरती एक मोठा दीपक असतो. जो परमज्योति परमात्म्याचे प्रतीक आहे. तसेच दीपस्तंभात खाली-खाली असलेले अनेक छोटे दीपक हे आत्म्यांचे प्रतिक आहे. विशेष म्हणजे दीपावलीच्या शुभ मुहूर्तावर दीपस्तंभावरील सर्व दीपक जेव्हा पेटविले जातात तेव्हा अतिशय विलोभनीय दृश्य दिसते. सर्वात वरती असतो तो जणू दीपराज परमात्मा व खाली जे छोटी दीपक असतात त्या जणू दीपराण्या..!

दीपावली हा केवळ एक सण नसून, ती सहा सणांची मालिका आहे. त्यात वसुबारस, धनत्रयोदशी, नर्कचतुर्दशी, श्री लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा व भाऊबीज या सणांचा समावेश आहे. **त्रिकालदर्शी शिव परमात्म्याने दिलेल्या सत्य ज्ञानानुसार दीपावलीचे सहा दिवस वर्तमान संगमयुगाचे (कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा आदि यांचा संधीकाळ) प्रतीक आहे. कसे ते आपण थोडक्यात पाहूया.**

परमज्योति शिव परमात्मा संगमयुगात प्रजापिता ब्रह्मा यांच्या साकार शरीरात अवतरित होऊन त्यांच्या मुखकमलाद्वारे सत्यगीताज्ञान देतात ते ज्ञान जे आपल्या जीवनात धारण करतात त्यांना ब्रह्मावत्स (ब्रह्माकुमार/ब्रह्माकुमारी) असे म्हटले जाते. अशा प्रकारे प्रजापिता ब्रह्मा हे सर्व ब्रह्मावत्सांना पवित्रेतची



पालना देऊन अलौकिक मातेचे कर्तव्य पार पाडतात. त्यामुळे प्रजापिता ब्रह्माबाबा व ब्रह्मावत्सांचे प्रतीक म्हणून सवत्सधेनूचे पूजन वसुबारसच्या दिवशी केले जाते. हा दीपावलीचा पहिला दिवस होय. अलौकिक माता प्रजापिता ब्रह्मा यांच्याद्वारे आपण परमात्मा पित्याच्या समीप येतो. त्यानंतर शिव परमात्मा पित्याकडून आपल्याला अविनाशी ज्ञान धनाची प्राप्ती होते. याचे प्रतीक आहे धनत्रयोदशी. त्यानंतर जसजसे आपण हे ज्ञान धारण करत जातो. तेव्हा आपली आत्मिक स्थिती शक्तिशाली बनत जाते. फळस्वरूप आत्म्यामध्ये असलेल्या पाच विकाररूपी नरकासूरावर आपण विजय प्राप्त करतो. त्यामुळे निर्विकारी बनणे म्हणजे खऱ्या अर्थी नर्कचतुर्दशी साजरी करणे होय! अशा रितीने संपूर्ण निर्विकारी बनल्यानंतर आपली आत्मज्योति (आत्मिक स्मृती) अखंडपणे उजळून निघते. फलस्वरूप आपण श्रीलक्ष्मी व श्रीनारायण समान बनतो. याचेच प्रतीक आहे दिवाळी अथवा श्रीलक्ष्मीपूजन! त्यानंतर बलिप्रतिपदा हा दिवस आहे, सत्ययुगाच्या आदिकाळाचे प्रतीक. कलियुगातील बळीचे राज्य जणू संपुष्टात येते व या भारत भूमीवर पुन्हा सत्ययुगी नवयुगाचा प्रांरभ होतो म्हणून कार्तिक शुध्द प्रतिपदेला बलिप्रतिपदा अथवा दीपावली पाडवा मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. त्यानंतर दिवाळीचा शेवटचा दिवस आहे, भाऊबीजेचा.. भाऊ बहिणीतील पवित्र प्रेमाचे प्रतीक असलेला हा मंगल मिलनाचा दिवस! सत्ययुगात देवीदेवता देखील संपूर्ण आत्मअभिमानी असल्याने त्यांच्यातही सदैव आत्मिक प्रेमाची गंगा वाहत असते. अशा प्रकारे पवित्रतेच्या आधारे प्रेम, सुख, शांतीमय नव सृष्टीच्या स्थापनेचे प्रतीक आहे भाऊबीज!

वरील विवेचनावरून आपल्या हे लक्षात आले असेल की परमज्योति शिव परमात्मा संगमयुगात अवतरित होऊन, ब्रह्माद्वारे सत्ययुगी नवसृष्टीच्या स्थापनेचे जे कर्तव्य करतात, त्याचीच जड यादगार म्हणून आजवर आपण ६ दिवसांचा दीपोत्सव साजरा करीत आलो, परंतु आता आपल्याला त्याविषयी ईश्वरीय सत्य ज्ञान प्राप्त झाले आहे. त्यामुळे केवळ पारंपरिक पध्दतीने दिवाळी साजरी न करता खऱ्या अर्थाने चैतन्य दिवाळी साजरी करूया व अवघे विश्व सत्य ज्ञानाच्या प्रकाशाने उजळून टाकूया. **आजवर आपण दिवाळीला श्री लक्ष्मीचे आवाहन करीत होतो. तिच्याकडून धनाची प्राप्ती व्हावी, अशी मनोकामना ठेवीत होतो, परंतु आता स्वयं शिव परमात्मा अविनाशी ज्ञानधन भरभरून देत आहे. ज्ञानरत्नांची आपल्यावर जणू उधळण करीत आहे. त्यांची धारण करून आपण श्री लक्ष्मी व श्रीनारायण यांच्यासमान बनूया.**

याचेच गायन आहे– 'नर ऐसी करनी करे, जो नरसे नारायण बने! नारी ऐसी करनी करे, जो नारीसे श्रीलक्ष्मी बने!'

तात्पर्य म्हणजे वर्तमान संगमयुगाचा संपूर्ण कालावधी हाच खऱ्या अर्थी दीपोत्सवाचा काळ आहे. आपण दरवर्षी साजरा करीत असलेला ६ दिवसांचा दीपोत्सव हा केवळ संगमयुगी दीपोत्सवाची, जड यादगार आहे. त्यामुळे यावर्षी दिवाळीच्या शुभमुहूर्तावर आपण हा दृढ संकल्प करूया की मी ईश्वरी ज्ञान व राजयोगाच्या शिक्षणाने माझ्या मनमंदिरातील विकारांचा कचरा साफ करून, सदा आत्मज्योति प्रज्वलित करीन. आसुरी अवगुण व कुसंस्कारांचे खाते बंद करून दैवीगुण संपन्न बनेल. तसेच मानवमात्राच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी तन–मन–धन सफल करीन.

असे केल्यानेच ही भारत भूमी पुन्हा पुण्यभूमी, स्वर्गभूमी, सुवर्णभूमी, देवीदेवतांची चरित्रभूमी बनेल. चला तर मग, मोठ्या आनंदाने, उत्साहाने आपणही चैतन्य दीपावली साजरी करूया– सार रूपाने गीताच्या पुढील ओळी आपल्या मनी दृढ धरा

पवित्र मनसा होता स्वयेच, लक्ष्मी होईल नारी!
नर होईल नारायण, जेव्हा तो श्रेष्ठ कर्म करी!
लक्ष्मी–नारायण जिथे नांदती, तीच दिवाळी खरी!
मर्म सणाचे सत्य सांगण्या, आले शिव भूवरी!!

– ब्रह्माकुमार शिवाजी

## गोड फळे देईल का रे..

पेरूनी काटे करिशी कामना, तू तर फुलांची ।
गोड फळे देईल का रे, वेल कारल्याची ।।धृ।।
काम, क्रोध, लोभाने, नाडले तुज तरीही ।
संग हा विकारांचा, अजूनी सोडलाच नाही ।
कशी प्राप्त व्हावी तुजला, कृपा ईश्वराची ।
गोड फळे देईल का रे, वेल कारल्याची ।।१।।
देतसे निरंतर माया, शाप मानवाला ।
दावून आस सुखाची, घालितसे घाला ।
खूणगाठ बांधूनी घेई, जीवनात याची ।
गोड फळे देईल का रे, वेल कारल्याची ।।२।।
काम–क्रोधादि रिपूंना, जिंकूनिया आता ।
होई तू बापसमान, दाता, वरदाता ।
कधी करू नको तू, साथ दुर्गुणांची ।
गोड फळे देईल का रे, वेल कारल्याची ।।३।।
करशील कर्म जेव्हा, श्रीमताप्रमाण ।
होशील तू सत्ययुगात, देवता महान ।
वाया नको घालवू रे, वेळ पुरुषार्थाची ।
गोड फळे देईल का रे, वेल कारल्याची ।।४।।

ब्रकु. विमल पंढरपूरे, सांगवी (पुणे)

## कधी तू करशील आत्मोन्नती ?

संगमयुगी या विनाश देखील, समीप आला अती ।
कधी तू करशील आत्मोन्नती ? ।।धृ।।
हिरेतुल्य हा काळ अल्पसा ।
व्यर्थ गमविशी का रे ऐसा ?
देव पदाचा प्राप्तिकाळ हा, स्वयेच शिव सांगती ।
कधी तू करशील आत्मोन्नती ? ।।१।।
सरिता, सागर संगम पावन ।
पुत्र, पित्याचे मंगल मीलन ।
श्रीमत पालन करिता होशिल, पद्मापद्मपती
कधी तू करशील आत्मोन्नती ? ।।२।।
जन्म मरजीवा इथे लाभतो ।
पतित आत्माही पावन होतो ।
पुरुषार्थाविण घडे न काही, घेऊन बघ अनुभूती ।
कधी तू करशील आत्मोन्नती ? ।।३।।

–(आधार 'ज्ञानसुधा ही शिवबाबांची' हा काव्यसंग्रह)



**जकातवाडी (कूपरकॉलनी सातारा) :** येथील सरपंच सौ. सिता जाधव यांना राखी बांधल्यानंतर ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. कांचन बहेन



**अमरावती :** एस.आर.पी. एफचे कमांडंट भ्राता महेश चिमटे यांना राखी बांधताना ब्र. कु. सीता बहेन सोबत, ब्र. कु. अश्विनी बहेन



**बोपोडी (पुणे) :** पोलिस अधिकारी वर्ग व पोलिस स्टाफ यांना 'तणाव जीवन' या विषयावर मार्गदर्शन केल्यानंतर, त्यांच्यासमवेत ब्र. कु. सुनिता व भाग्यश्री बहेन तसेच ब्र. कु. सनिल भाई



**बांबवडे (शिपे) :** उदय साखर कारखान्याचे संचालक श्री. अजय पाटील यांना राखी बांधताना ब्र. कु. संगीता बहेन



**पेरन फाटा :** करिअर ॲकॅडमीचे डायरेक्टर श्री. दुबे यांना राखी बांधताना ब्र. कु. अंजली बहेन



**मलकापूर (कोल्हापूर) :** पी.एस.आय. अजय पवार व पोलिस स्टाफला ईश्वरीय संदेश दिल्यानंतर राखी बांधताना ब्र. कु. वंदना व वर्षा बहेन



**गडचिरोली :** कुरखेडा येथील नवनिर्मित 'राजयोग मेडिटेशन हॉल' चे उद्घाटन करतांना ब्र. कु. नलिनी दीदी सोबत ब्र. कु. प्रकाशभाई, डॉ. गोवर्धन भाई, आशाताई कानबळे व अन्य



**नांदेड (कैलासनगर) :** स्वामी विरपकारा, वीरभद्र संस्थानचे प्रमुख यांना रक्षासूत्र बांधताना ब्र. कु. शिवकन्या बहेन



**रोहा :** नगराध्यक्ष श्री. संतोष पोटफोडे यांना पावन राखी बांधल्यानंतर ईश्वरीय भेटवस्तू देतांना ब्र. कु. मंदा बहेन व अन्य



**हिंगण घाट :** एस.बी.आय. चे चीफ मॅनेजर श्री. गजानन माळवे यांना राखी बांधताना ब्र. कु. जयमाला बहेन



**सावंतवाडी :** मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शेखर सिंह यांना रक्षासूत्र बांधताना ब्र. कु. कांचन दीदी



**पालघर :** डेप्युटी कलेक्टर श्री. संतोष देशमुख यांना राखी बांधताना ब्र. कु. हेमा बहेन